


दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com




सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक ७२ वा | गुरुवार, दि. ०८ ऑक्टोबर २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या जखमेवर 'ऑनलाइन' कारभाराचा मीठाचा खडा!

## पीक पंचनाम्यासाठी शेतकरी कागदपत्रांच्या फेऱ्यात

## फार्मर आयडी, डिजिटल सातबारा संकेतस्थळ बंद

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):** मान्सूनने महाराष्ट्रातून माघार घेतली आणि मागे ठेवला तो अभूतपूर्व दुष्काळाचा वणवा. पिके करपली, विहिरी-तलाव आटले, जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर झाला असताना आता दुष्काळी मदतीसाठी आवश्यक पीक पंचनाम्याच्या प्रक्रियेतही शेतकऱ्यांची फरफट सुरू झाली आहे. फार्मर आयडी आणि डिजिटल सातबारा उताऱ्याचे संकेतस्थळ बंद असल्याने दुष्काळाने होरपळलेल्या शेतकऱ्यांना कागदपत्रांसाठी हेलपाटे मारण्याची वेळ आली आहे.

यंदा मान्सूनच्या लहरीपणामुळे सोलापूर जिल्ह्यात शेतीचे अर्थकारण अक्षरशः कोलमडून पडले आहे. अल्प पावसावर कसाबसा उभा राहिलेला खरीप पिकांचा संसार पावसाच्या प्रदीर्घ खंडामुळे उद्ध्वस्त झाला. पिकांना पाणी मिळाले नाही आणि हातातोंडाशी आलेली पिके डोळ्यादेखत जळून गेली. शासनाने परिस्थितीची दखल घेत संपूर्ण जिल्हा दुष्काळग्रस्त घोषित करून बाधित क्षेत्राचा ट्रिगर वनमध्ये समावेश केला आहे.

पीक नुकसानीचे पंचनामे तातडीने पूर्ण करण्यासाठी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी तलाठी, ग्रामसेवक आणि कृषी सहायकांना सूचना दिल्या आहेत. दहा दिवसांत पंचनामे पूर्ण करण्याचे उद्दिष्ट प्रशासनाने ठेवले आहे. त्यानुसार कर्मचारी भर उन्हात शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिकांची पाहणी करीत आहेत. मात्र पंचनाम्याच्या पुढील प्रक्रियेसाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करताना शेतकऱ्यांसमोर नवाच पेच निर्माण झाला आहे.




### फार्मर आयडीसाठी सीएससी केंद्रांवर रांगा

पंचनाम्यासाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांमध्ये फार्मर आयडीला महत्त्व आहे. मात्र गेल्या काही दिवसांपासून फार्मर आयडीचे संकेतस्थळच बंद असल्याने ज्या शेतकऱ्यांकडे आयडी नाही, त्यांना तो काढण्यासाठी सीएससी केंद्रांचे उंबरठे झिजवावे लागत आहेत. संकेतस्थळ सुरू होण्याची प्रतीक्षा करत शेतकरी तासन्तास बसून राहत आहेत.

सोलापूर जिल्ह्यात दुष्काळाने शेती उद्ध्वस्त केली असताना आता शासकीय कागदपत्रांसाठीही शेतकऱ्यांची फरफट सुरू झाली आहे. फार्मर आयडीचे संकेतस्थळ बंद असल्याने नवीन आयडी काढता येत नाही; डिजिटल सातबारा संकेतस्थळही बंद असल्याने उतारा मिळविण्याचा पर्याय कुचकामी ठरला आहे.

तलाठ्यांकडे अनेक गावांचा अतिरिक्त पदभार आणि त्यात पंचनाम्याचे काम असल्याने शेतकऱ्यांच्या अडचणी आणखी वाढल्या आहेत. निसर्गाने पिके हिरावून घेतली; आता ऑनलाइन यंत्रणेने मदतीची कागदपत्रेही हिरावून घेतली, अशी संतप्त भावना शेतकऱ्यांतून व्यक्त होत आहे.

दुष्काळामुळे आधीच आर्थिक कोंडीत सापडलेल्या शेतकऱ्याला शासकीय मदत मिळण्यासाठी आवश्यक कागदपत्रे मिळवतानाच जर ऑनलाइन यंत्रणेचा अडथळा येत असेल, तर दुष्काळग्रस्तांना मदत कधी आणि कशी मिळणार ?, असा सवाल उपस्थित होत आहे.

### तलाठ्यांवर गावांचा अतिरिक्त भार

दुसरीकडे, तालुक्यातील अनेक तलाठ्यांकडे एकापेक्षा अधिक गावांचा पदभार आहे. काही तलाठी सध्या पीक पंचनाम्याच्या कामात व्यस्त असल्याने शेतकऱ्यांना सातबारा उतारे मिळवण्यासाठीही अडचणी येत आहेत. प्रशासनाने या समस्येवर पर्याय म्हणून डिजिटल सातबारा उतारा उपलब्ध करून दिला; मात्र डिजिटल सातबाऱ्याचे संकेतस्थळही बंद असल्याने शेतकऱ्यांची कोंडी आणखी वाढली आहे. एकीकडे दुष्काळाने पिके उद्ध्वस्त केली, दुसरीकडे मदतीसाठी आवश्यक कागदपत्रे मिळवताना शासकीय ऑनलाइन यंत्रणा बंद पडली. त्यामुळे निसर्गाच्या दुष्काळाने होरपळलेला शेतकरी आता प्रशासनाच्या डिजिटल दुष्काळातही अडकला आहे.

### पंचनामे दहा दिवसांत; मग कागदपत्रे कुठून आणायची ?

प्रशासनाने दहा दिवसांत पंचनामे पूर्ण करण्याचे आदेश दिले असले, तरी शेतकऱ्यांना आवश्यक कागदपत्रे मिळत नसतील तर या मुदतीत पंचनाम्याची प्रक्रिया पूर्ण होणार कशी, हा प्रश्न आहे. शासनाने एकीकडे तातडीने पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत; मात्र दुसरीकडे त्या पंचनाम्यांसाठी आवश्यक असलेल्या ऑनलाइन सुविधा सुरळीत नसल्याने आदेश आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी यांच्यात मोठी दरी निर्माण झाली आहे.

दुष्काळग्रस्त शेतकऱ्याला मदत देण्यासाठी प्रशासनाने कागदपत्रांची गुंतागुंत कमी करून पर्यायी व्यवस्था तातडीने उपलब्ध करून द्यावी आणि फार्मर आयडी व डिजिटल सातबारा संकेतस्थळ तात्काळ सुरळीत करावे, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

### दुष्काळाचा दुहेरी तडाखा

सोलापूर जिल्ह्यात यंदा पावसाची राज्यातील सर्वाधिक तूट नोंदली गेली आहे. पिके करपली असून रब्बी हंगामही धोक्यात आला आहे. जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. अशा परिस्थितीत शासनाच्या मदतीकडे शेतकऱ्यांचे डोळे लागले आहेत. मात्र मदतीच्या प्रक्रियेतील पहिल्याच टप्प्यावर ऑनलाइन यंत्रणा अडथळा ठरत असल्याने 'दुष्काळ जाहीर झाला, पण मदत मिळणार कधी ?' असा संतप्त सवाल शेतकऱ्यांकडून उपस्थित केला जात आहे.

# पंतप्रधान मोदी यांच्या प्रतिमेला जोडे मार करून काँग्रेसचे निदर्शने

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मोदी सरकारला वोटचोरीसाठी मदत करणाऱ्या मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी दिल्ली येथे आंदोलन करणारे लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुलजी गांधी, खासदार प्रियंका गांधी, सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या खासदार प्रणितीताई शिंदे यांच्यासह काँग्रेसच्या शेकडो खासदारांना पोलिसांनी ताब्यात घेतल्याच्या निषेधार्थ सोलापूर शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने काँग्रेस भवन सोलापूर जवळ तीव्र निदर्शने करण्यात आली.

शहर काँग्रेस अध्यक्ष चेतनभाऊ नरोटे आणि जिल्हा काँग्रेस अध्यक्ष सातलिंग शटगार यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस भवनाजवळ हे आंदोलन करण्यात आले. यावेळी नरेंद्र मोदी यांच्या प्रतिमेला जोडे मारून मोदी सरकारच्या दडपशाहीचा निषेध करण्यात आला.



आंदोलनादरम्यान काँग्रेस पदाधिकारी आणि पोलिसांमध्ये झटापटही झाली. काही कार्यकर्त्यांचे कपडेही फाटले.

यावेळी कार्यकर्त्यांनी 'गली गली में शोर है, मोदी सरकार चोर है', 'ज्ञानेश कुमार राजीनामा द्या', 'राहुलजी गांधी संघर्ष करो, हम तुम्हारे साथ हैं...', 'प्रणितीताई संघर्ष करो, हम तुम्हारे साथ हैं', 'मोदी तेरी हुकूमशाही नहीं चलेगी' अशा जोरदार घोषणा देत परिसर दणाणून सोडला.

यावेळी बोलताना शहर काँग्रेस अध्यक्ष चेतन नरोटे म्हणाले की, मतदारांच्या अधिकारांचे रक्षण, निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनामा, SIR रद्द करणे, बॅलेट पेपरवर निवडणुका घेण्यात यावेत या मागणीसाठी राहुलजी गांधी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस खासदारांनी लोकशाही मार्गाने आंदोलन केले. मात्र, प्रश्नांना उत्तर देण्याऐवजी मोदी सरकारने पोलिसी बळाचा वापर करून राहुलजी गांधी, प्रियंका गांधी, प्रणितीताई शिंदे यांच्यासह शेकडो खासदारांना ताब्यात घेतले. ही लोकशाहीची गळचेपी आहे. निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता आणावी आणि मतपत्रिकेवर निवडणुका घेण्याबाबत काँग्रेसने उपस्थित केलेल्या प्रश्नांची सरकारने उत्तरे द्यावीत. निवडणूक आयोगाच्या निष्पक्षतेबाबत जनतेच्या मनात निर्माण झालेल्या प्रश्नांवर स्पष्टीकरण देण्याऐवजी विरोधकांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केला जात आहे, असा आरोप नरोटे यांनी केला.

लोकशाहीचा आवाज दडपून सत्ता टिकवता येत नाही. आज राहुलजी गांधींना ताब्यात घ्याल, उद्या काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना ताब्यात घ्याल; मात्र जनतेचा आवाज कायमचा दाबता येणार नाही. लोकशाही आणि संविधानाच्या रक्षणासाठी हा संघर्ष शेवटपर्यंत सुरू राहील,' असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

चेतन नरोटे पुढे म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला दिलेल्या संविधानाच्या मूल्यांवर काँग्रेसचा ठाम विश्वास आहे. मतदारांच्या अधिकारांचे संरक्षण आणि लोकशाही संस्थांची स्वायत्तता अबाधित ठेवण्यासाठी काँग्रेस रस्त्यावर उतरली आहे. मोदी सरकारने दडपशाहीचा कितीही वापर केला तरी राहुलजी गांधींचा संघर्ष थांबणार नाही आणि काँग्रेसचा (पान 2 वर..)

# शक्तीपीठ महामार्गासाठी शेतकऱ्यांची 'जबरदस्तीची मोजणी'

## १३ जिल्ह्यांच्या बैठकीत सोलापूरच्या प्रकाराचा निषेध

**सोलापूर (कटूसत्य वृत्त) :** गरज नसलेला शक्तीपीठ महामार्ग रद्द करण्याच्या मागणीसाठी पुढील आंदोलनाची दिशा ठरविण्यासाठी राज्यातील १३ जिल्ह्यांतील शक्तीपीठ महामार्गबाधित शेतकऱ्यांची ऑनलाइन बैठक पार पडली. या बैठकीत सोलापूर जिल्ह्यातील नांदेरे, आव्हे, बाव्हे आणि सोळंकरवाडी परिसरात झालेल्या मोजणीच्या कारवाईचा तीव्र निषेध करण्यात आला.



या ऑनलाइन बैठकीला माजी खासदार राजू शेट्टी, आमदार जयंत पाटील यांच्यासह शक्तीपीठ महामार्गबाधित शेतकरी आणि विविध आंदोलनकर्ते सहभागी झाले होते. सोलापूर जिल्ह्यातील कारवाईबाबत बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीत मांडण्यात आलेल्या माहितीनुसार, नांदेरे, आव्हे, बाव्हे आणि सोळंकरवाडी या गावांमध्ये मोठ्या पोलीस बंदोबस्तात मोजणीची कारवाई करण्यात आली. शेतकऱ्यांना नजरकैदेत ठेवून, गावाला मोठ्या पोलीस फौजफाट्याने घेरून मोजणी करण्यात आल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. या पद्धतीने करण्यात आलेल्या मोजणीमुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजी निर्माण झाली असून, प्रशासनाच्या भूमिकेवरही प्रश्न उपस्थित करण्यात आले.

शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, शक्तीपीठ महामागार्साठी जमिनी जाणार असल्याने त्यांच्या उपजीविकेचा आणि भवितव्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे प्रकल्पाबाबत शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांची भूमिका समजून घेणे आवश्यक असताना, मोठ्या पोलीस बंदोबस्तात मोजणीची कारवाई केल्याने संघर्ष आणखी तीव्र होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली.

या बैठकीत ह्यशेतकऱ्यांच्या संमतीशिवाय आणि विरोधाच्या वातावरणात होणारी मोजणी मान्य नाही', अशी भूमिका आंदोलकांकडून मांडण्यात आली. शक्तीपीठ महामार्ग रद्द करण्याच्या मागणीसाठी आंदोलनाची पुढील दिशा ठरविण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली.

शक्तीपीठ महामार्ग विरोधी संघर्ष समितीचे गिरीष फोंडे यांच्यासह सोलापूर जिल्ह्यातील बाधित शेतकरी या ऑनलाइन बैठकीत सहभागी झाले होते. राज्यातील विविध जिल्ह्यांतील शेतकऱ्यांनीही आपापल्या भागातील परिस्थिती मांडत प्रकल्पाविरोधातील लढा अधिक संघटित करण्याची भूमिका व्यक्त केली.

दरम्यान, शेतकऱ्यांच्या जमिनी, उपजीविका आणि भवितव्याशी संबंधित निर्णय केवळ प्रशासकीय प्रक्रियेपुरता मर्यादित ठेवता येणार नाही, अशी भूमिका बैठकीत व्यक्त करण्यात आली. प्रशासनाने शेतकऱ्यांशी संवाद साधावा, त्यांच्या आक्षेपांवर चर्चा करावी आणि प्रकल्पाच्या गरजेबाबत स्पष्टता द्यावी, अशी मागणीही पुढे आली.

शक्तीपीठ महामागार्चा मुद्दा आता केवळ एखाद्या जिल्ह्यापुरता राहिलेला नसून १३ जिल्ह्यांतील बाधित शेतकऱ्यांच्या आंदोलनाचा विषय बनला आहे. त्यामुळे आगामी काळात या प्रकल्पाविरोधातील आंदोलनाची दिशा काय असेल, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

शेतकऱ्यांच्या विरोधाला पोलिसांच्या बंदोबस्ताने उत्तर देण्याऐवजी सरकारने संवादाचा मार्ग स्वीकारावा, अन्यथा शक्तीपीठ महामार्गाचा संघर्ष आणखी व्यापक होण्याची शक्यता आहे, असा इशारा बैठकीतून देण्यात आला.

# डीजे, विनापरवाना फलकांवर बंदी कायम

## गळ्यात सोन्याची साखळी मिरवणाऱ्या पोस्टरबाजांची होणार चौकशी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** आगामी नवरात्रोत्सव आणि धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या पार्श्वभूमीवर मिरवणुकीतील डीजेवरील बंदी कायम राहील, तसेच विनापरवाना फलक लावून गळ्यात सोन्याच्या जाड साखळ्या मिरवत चमकोगिरी करणाऱ्या पोस्टरबाजांची विशेष चौकशी केली जाईल, असा इशारा शहर पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी दिला.

नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असेही त्यांनी ठणकावून सांगितले.



सोलापूर शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस आयुक्तालयात शांतता समितीची संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीचे प्रास्ताविक पोलीस उपआयुक्त (गुन्हे) डॉ. अश्विनी पाटील यांनी केले. अध्यक्षस्थानावरून बोलताना पोलीस आयुक्त म्हणाले, उत्सव काळात शांतता राखणे ही केवळ पोलिसांचीच नव्हे, तर मंडळे आणि नागरिकांचीही सामूहिक जबाबदारी आहे. कोणत्याही अफवा किंवा गैरसमज पसरवणाऱ्या कृत्यांना थारा देऊ नका, संवेदनशील भागांत मिरवणुका विनाकारण रेंगाळत ठेवू नयेत, अशा सूचना त्यांनी दिल्या.

या वेळी नवरात्र महोत्सव महामंडळाचे अध्यक्ष विजय पुकाळे यांनी फिरती स्वच्छतागृहे व पिण्याच्या पाण्याची मागणी केली. बैठकीस पोलीस उपआयुक्त वृष्टी जैन, डॉ. अश्विनी पाटील, प्रितम यावलकर, सहायक पोलीस आयुक्त विजयालक्ष्मी कुर्री, गुन्हे शाखेचे दिलीप पवार, वाहतूक शाखेचे मनोज यादव, महापालिकेच्या वीना पवार, धमार्दाय कार्यालयाचे कपिल चोपडे, सिव्हिल सर्जन डॉ. कमलाकर माने, आरटीओचे स्वप्निल गिरी आणि शांतता समितीचे सदस्य उपस्थित होते.

### शांतता बैठकीत या विषयांवर देखील झाली चर्चा

**पारंपरिक वाद्यांना प्राधान्य :** मिरवणुकीत केवळ पारंपरिक वाद्ये वाजवावीत. सर्वोच्च न्यायालयाच्या ध्वनीप्रदूषण विषयक नियमांचे काटेकोर पालन करणे बंधनकारक आहे.

**जबरदस्तीने वर्गणीस मनाई:** मंडळांनी धमार्दाय आयुक्तांकडे नोंदणी करून रीतसर परवानगी घ्यावी. देणगी स्वेच्छेने दिल्यासच स्वीकारावी; कोणावरही सक्ती करू नये.

**सुरक्षितता व सीसीटीव्ही :** मंडपात सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत. महिला, लहान मुले व ज्येष्ठांच्या सुरक्षेसाठी स्वयंसेवकांनी दक्ष राहावे. मूतीर्ची काळजी घ्यावी व मोकाट जनावरांचा बंदोबस्त ठेवावा.

**वाहतुकीचे नियम :** मंडपासाठी रस्त्याचा २/३ भाग वाहतुकीसाठी मोकळा ठेवावा. वाहनांचे सायलेन्सर काढून आवाज करणे, ट्रिपल सीट फिरणे व हुल्लडबाजीवर थेट दंडात्मक कारवाई होईल. मिरवणुकीत लांब कंटेनर वापरण्यास सक्त मनाई आहे.

**सामाजिक संदेश :** देखाव्यांमध्ये आक्षेपार्ह बाबी टाळून सायबर सुरक्षा, जलसंवर्धन, स्वच्छता व वृक्षारोपण अशा समाजोपयोगी जनजागृतीला प्राधान्य द्यावे.

**पदयात्रेकरूंना संरक्षण:** कोजागिरीनिमित्त तुळजापूरला जाणाऱ्या भाविकांना कोणताही अडथळा येऊ नये म्हणून शहरात चोख पोलीस बंदोबस्त नियुक्त करण्यात येईल.




# दक्षिण सोलापुरातील सहा तलावांत उजनीचे पाणी

## पाणीटंचाईच्या संकटातून मोठा दिलासा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** दक्षिण सोलापूर तालुक्यात निर्माण झालेल्या तीव्र पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर उजनी धरणाचे पाणी तालुक्यातील सहा प्रमुख तलावांमध्ये पोहोचले आहे. मंद्रूप, निंबर्गी, शिरवळ (जै.),



आचेगाव, हणमगाव आणि रामपूर या तलावांमध्ये उजनीचे पाणी पोहोचल्याने परिसरातील शेतकरी, ग्रामस्थ आणि पशुपालकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

मागील काही महिन्यांपासून पावसाच्या (पान 2 वर..)

# सरकारचे 2 मंत्री एमपीएससी आंदोलनस्थळी जाणार!



**पुणे (कटूसत्य वृत्त):-** एमपीएससी परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांचे पेपरफुटी प्रकरणावरुन पुण्यात आंदोलन सुरु आहे. या प्रकरणी निष्पक्ष चौकशी व्हावी, अशी विद्यार्थ्यांची मागणी आहे. तसेच विद्यार्थ्यांकडून या प्रकरणावरुन एमपीएससीचे विद्यमान अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे.

विद्यार्थी भीमनवार यांच्या राजीनाम्यासाठी प्रचंड आग्रही आहेत. विद्यार्थ्यांच्या या मागणीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यपालांकडे महत्त्वाची विनंती देखील केली आहे. यानंतर आता या प्रकरणी आणखी महत्त्वाची अपडेट येत आहे. आमदार रोहित पवार यांनी महत्त्वाची माहिती दिली आहे.

### रोहित पवार काय म्हणाले ?

रोहित पवार यांनी आंदोलक विद्यार्थ्यांना उद्देशून उद्या सरकारचे दोन मंत्री आंदोलनस्थळी भेट देणार अशून या प्रकरणी शंभर टक्के तोडगा निघणार असल्याची माहिती दिली.

(पान 2 वर..)



## संपादकीय

# मतदाराचे नाव गायब, लोकशाहीचा आवाज बंद?

मतदार यादीतून एखाद्या नागरिकाचे नाव गायब होणे ही साधी 'तांत्रिक चूक' म्हणून झटकून टाकण्याची बाब नाही. ज्या क्षणी पात्र मतदाराचे नाव यादीतून नाहीसे होते, त्या क्षणी त्याचा मतदानाचा अधिकार प्रत्यक्षात धोक्यात येतो. आणि निवडणुकीच्या दिवशी मतदान केंद्रावर पोहोचल्यानंतर 'नावच नाही' असे सांगितले गेले, तर त्याच्याकडे लोकशाहीच्या दारातून परत फिरण्याशिवाय पर्याय उरत नाही.

निवडणूक आयोगाकडे आधुनिक तंत्रज्ञान आहे, पोर्टल आहे, ऑनलाइन अर्ज आहेत, डिजिटल पडताळणी आहे. पण या सगळ्या यंत्रणांचा अंतिम उद्देश काय? नागरिकाचा मतदानाचा अधिकार सुरक्षित करणे की नागरिकाला पोर्टलच्या चक्रव्यूहात अडकवणे? यापेक्षा गंभीर बाब कोणती?

नाव गायब झाले. नागरिकाने ऑनलाइन शोध घेतला. नाव सापडले नाही. पुन्हा नोंदणी करण्याचा प्रयत्न केला. प्रक्रिया अडली. अर्ज कुठे पोहोचला, त्यावर काय निर्णय झाला, नाव का वगळले गेले. याचे समाधानकारक उत्तर मिळाले नाही. अशा वेळी 'तांत्रिक अडचण' हा शब्द नागरिकाच्या हक्काची भरपाई करू शकत नाही.

तंत्रज्ञान चुकू शकते; पण त्या चुकीची किंमत नागरिकाच्या मताने का मोजावी? हा प्रश्न निवडणूक आयोगाला विचारावाच लागेल. न्यायालयाने मतदार यादीतील नाव वगळण्याच्या प्रक्रियेबाबत केलेली निरीक्षणे या पार्श्वभूमीवर अत्यंत महत्त्वाची ठरतात. संबंधित मतदाराचे नाव वगळण्यापूर्वी चौकशी आणि त्याला आपली बाजू मांडण्याची योग्य संधी मिळणे आवश्यक असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. म्हणजेच मतदार यादी ही केवळ संगणकातील डेटा नाही; त्या डेटामागे जिवंत नागरिकाचा लोकशाही हक्क आहे.

मग प्रश्न असा नाव वगळताना जर प्रक्रिया काटेकोर असणे अपेक्षित असेल, तर नाव पुन्हा जोडताना नागरिकाला इतकी धावपळ का करावी लागते? निवडणूक आयोगाने याचे उत्तर द्यायलाच हवे. कारण निवडणूक प्रक्रियेत सर्वांत महत्त्वाचा घटक ईव्हीएम नाही, पोर्टल नाही, अधिकारी नाही तर मतदार आहे.

मतदार यादीतील प्रत्येक नाव म्हणजे लोकशाहीतील एक मत. त्या एका मताची किंमत निवडणुकीच्या निकालात किती असेल, हे वेगळे; पण त्या मताचा अधिकारच नाकारला गेला तर संपूर्ण प्रक्रियेच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उभे राहते. याहून धोकादायक बाब म्हणजे अशा प्रकारच्या समस्येचा फटका सर्वाधिक सामान्य नागरिकाला बसतो. तांत्रिक प्रक्रिया समजत नाही, ऑनलाइन अजार्चा मागोवा घेता येत नाही, कार्यालयीन पातळीवर कोणाकडे दाद मागायची हे माहीत नसते आणि शेवटी मतदानाचा दिवस हातातून निसटतो.

लोकशाहीने नागरिकाला तंत्रज्ञान समजून घेण्याची परीक्षा घेऊ नये; उलट तंत्रज्ञानाने नागरिकाचा हक्क सुरक्षित करण्याची परीक्षा उत्तीर्ण व्हायला हवी. म्हणून आता निवडणूक आयोगाने केवळ 'पोर्टल सुरू आहे' एवढे सांगून चालणार नाही. किती नावे वगळली? कोणत्या कारणांनी वगळली? किती नागरिकांनी पुनर्नोंदणीसाठी अर्ज केले? किती अर्ज प्रलंबित आहेत? किती अर्ज फेटाळले? फेटाळण्याची कारणे काय? तक्रारींचे निवारण किती वेळात झाले? या प्रश्नांची सार्वजनिक आणि पारदर्शक उत्तरे मिळाली पाहिजेत.

नाव वगळण्याच्या प्रक्रियेत चूक झाली असेल तर ती दुरुस्त करण्याची जबाबदारीही यंत्रणेचीच असली पाहिजे. नागरिकाने वारंवार कार्यालयांचे उंबरठे झिजवणे, ऑनलाइन अर्जाच्या फेऱ्या मारणे आणि शेवटी मतदानाच्या दिवशी हताश होणे, ही लोकशाहीची स्वीकारार्ह अवस्था नाही.

'तुमचे नाव यादीत नाही' हे चार शब्द एखाद्या नागरिकाच्या पाच वर्षांच्या लोकशाही सहभागावर पाणी फेरू शकतात. म्हणून या प्रश्नाकडे निवडणूक आयोगाने केवळ प्रशासकीय त्रुटी म्हणून पाहू नये. प्रत्येक गायब झालेले नाव म्हणजे एका नागरिकाच्या हक्काचा प्रश्न आहे. प्रत्येक प्रलंबित अर्ज म्हणजे एका नागरिकाची चिंता आहे. आणि प्रत्येक अनुत्तरित तक्रार म्हणजे निवडणूक व्यवस्थेवरील विश्वासाला लागलेला धक्का आहे.

निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेचा अर्थ केवळ त्याला घटनात्मक दर्जा मिळणे नाही; स्वायत्ततेसोबत उत्तरदायित्वही येते. नागरिकांच्या मताधिकाराशी संबंधित प्रत्येक प्रक्रियेत पारदर्शकता, अचूकता आणि जबाबदारी दिसली पाहिजे.

न्यायालयाला या प्रक्रियेतील मूलभूत बाबी अधोरेखित कराव्या लागत असतील, तर निवडणूक यंत्रणेने त्यातून आत्मपरीक्षण करणे अपेक्षित आहे. कारण शेवटी प्रश्न एका पोर्टलचा नाही. प्रश्न एका मताचा आहे. प्रश्न एका नागरिकाच्या आवाजाचा आहे. आणि प्रश्न आहे लोकशाहीच्या दारात उभ्या असलेल्या त्या नागरिकाला आत प्रवेश मिळणार आहे की नाही? निवडणूक यंत्रणेने या प्रश्नाचे उत्तर केवळ कागदावर किंवा पोर्टलवर नव्हे, तर प्रत्यक्ष कृतीतून द्यावे.

मतदाराचे नाव गायब होणे ही 'सिस्टम एरर' असू शकते; पण त्या एररमुळे नागरिकाचा मताधिकार गायब होणे, ही लोकशाहीची समस्या आहे.

# मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्न चिन्ह!

भारतात लोकशाही आहे त्या पध्दतीने संविधानाच्या माध्यमातून संपूर्ण नियमावली तयार करण्यात आली आहे त्यानुसार देश व देशाचा कारभार चालतो. परंतू यात जर कोणी चुका करीत असेल तर त्याच्या कठोर कारवाई झालीच पाहिजे.परंतु ज्ञानेश कुमार सारखे मुख्य निवडणूक आयुक्त यात ढवळाढवळ करून पदाचा दुरुपयोग करीत असेल तर त्यांना संविधानिक पदावर रहाण्याचा तिळमात्र अधिकार नाही. कारण भारतातील निवडणूक प्रक्रिया देश घडविते व त्यातून देशाचे सूत्रसंचालक चालत असते.परंतु ज्यावेळेस तीन निवडणुक आयुक्त असतात तेव्हा सवार्णूमते निर्णय ग्राह्य धरण्यात येतो.परंतु जेव्हा तिन्ही निवडणूक अधिकाऱ्यांमध्ये खटकते आणि ज्ञानेश कुमार सारखे निवडणूक आयुक्त दोन आयुक्तांच्या सुचना किंवा निर्णय ऐकत नाही किंवा धाब्यावर ठेवतात तेव्हा लक्षात येते की, ज्ञानेश कुमार सारखे आयुक्त मनमानी करीत असावेत.याच माध्यमातून ज्ञानेश कुमार यांनी एसआयआर प्रक्रियेत मोठा घोळ केला असुन निवडणूक प्रक्रियेत मोठी ढवळाढवळ केल्याचे चित्र देशापुढे स्पष्ट दिसत आहे. त्यामुळेच सर्वत्र आक्रोशाचे वातावरण पहायला मिळत आहे. आज संपूर्ण विरोधी पक्ष व सर्वसामान्य नागरिक ज्ञानेश कुमार यांच्यावर कारवाईची व निलंबनाची मागणी करीत आहे यावरून स्पष्ट होते की, ज्ञानेश कुमार यांनी मोठा घोळ केला असावा.कारण ज्ञानेश कुमार यांनी एसआयआर प्रक्रियेत मोठा घोळ करत देशातील अंदाजे १३ करोड मतदारांचे नाव कापले यात २ करोड ८० मृत्यू मतदार सांगितले जाते व बाकी १० करोड २० लाख मतदारांचे काय यावर ज्ञानेश कुमार यांनी चुप्पी साधल्याने संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहेत आणि त्यातूनच ज्ञानेश कुमार यांच्यावर चौतर्फा हल्ला सुरू झाला व आता ही बाब स्पष्ट झाली आहे की मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी सरकारच्या सांगण्यावरूनच एसआयआर च्या माध्यमातून १० करोड २० लाख मतदारांचे नाव मतदार यादीतून वगळण्यात आले.त्यामुळे यावर सरकार ज्ञानेश कुमार यांच्यावर सरळ कारवाई करण्यास हिचकिचावतांना दिसत आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, निवडणूक आयोगातील इतर दोन निवडणूक आयुक्त सुखबीर सिंह संधू आणि विवेक जोशी यांनी नोव्हेंबर २०२५ ते ऑगस्ट २०२६ या काळात 'विशेष सखोल पुनरीक्षण' (एस आय आर) प्रक्रियेसह विविध निर्णयांवर किमान १४ वेळा लेखी आक्षेप व असहमती नोंदवली होती.परंतू मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी इतर आयुक्तांना विश्वासात न घेता किंवा त्यांच्या सल्ल्याविरुद्ध जाऊन फॉर्म ६ मधील बदल आणि मतदार यादी डेटाच्या केंद्रीकरणासारखे निर्णय एकतर्फी घेतल्याचा आरोप त्यांच्यावर आहेत.या एकतर्फी निर्णयामुळे देशभरात सुमारे १० करोड ८० लाख मतदार मतदार यादीतून वगळले गेल्याचा आणि पात्र मतदारांवर गदा आल्याचा दावा करण्यात आला आहे. यावरून स्पष्ट होते की, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार व सरकारमधील काही राजकीय पुढारी निवडणूक प्रक्रियेत अवश्य ढवळाढवळ करून घोळ करीत असावेत.२०२३ च्या कायद्यात निवडणूक आयुक्तांनी निर्णय शक्यतो एकमताने घ्यावेत,अशी तरतूद आहे. एकमत न झाल्यास बहुमताचा निर्णय अंतिम मानला जाईल. मुख्य निवडणूक आयुक्त एकतर्फी निर्णय घेत होते आणि त्यातून लाखो मतदारांची नावे अधिकृतपणे वगळली किंवा नव्याने समाविष्ट केली जात होती, हे नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या एका बातमीने समोर आल्याने देशात आक्रोश निर्माण झाला आहे. यावरून स्पष्ट होते ज्ञानेश कुमार अवश्य दोषी असावेत.त्यांनी केलेल्या चुका प्रेस कॉन्फरन्सच्या माध्यमातून ताबडतोब मिडिया समोर येऊन सांगाव्यात किंवा ताबडतोब आपल्या पदाचा राजीनामा द्यावा यासाठी सर्वच स्तरातून देशभरात मोठ्या प्रमाणात आंदोलनाला सुरुवात झाली आहे. सध्याच्या परिस्थितीत एस आय आर पध्दतीनेमध्ये भयंकर घोळ सुरू असल्याचे दिसून येते काहिंना जन्म दाखला मागत आहे, काहिंना आईची माहिती, वडिलांची, आजोबांची अशा अनेक प्रकारच्या नवीन-नवीन बाबी एस आय आर प्रक्रियेत निर्माण झाल्याने अनेकांना याबाबत नोटीस बजावली आहे यामुळे देशाचा सर्वसामान्य नागरिक सुद्धा विद्धेत असल्याचे दिसून येते. एस आय आर मध्ये मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी आधारकार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, पॅनकार्ड, इलेक्शन कार्ड, इलेक्ट्रॉनिक बिल किंवा कोणताही आयडी प्रुफ गृहीत धरून एस आय आर प्रक्रिया सहज पूर्ण करता येते. परंतु सध्या एस आय आर मध्ये ज्ञानेशकुमार यांची मनमानी दिसून येत असून संविधानिक पदाचा गैरवापर करतांना दिसतात. ज्ञानेशकुमार यांच्या कथीत घोळ प्रकरणात सरकारने अधिकृतरित्या उत्तर द्यावे सत्ताधारी राजकीय पक्षांनी किंवा पुढाऱ्यांनी यात ढवळाढवळ करू नये व राजकारण करण्याचा प्रयत्न करू नये.निवडणूक प्रक्रियेबद्दल सरकारला किंवा निवडणूक आयोगाला प्रश्न विचारण्याचा संपूर्ण अधिकार सर्वसामान्य जनतेला व विरोधकांना आहे याची जाणीव सरकारने ठेवावी.त्यामुळे त्यांच्या प्रश्नाचे उत्तर कायद्याच्या माध्यमातून सरकारने द्यायला पाहिजे.मृत व दुबार असलेल्यांची नावे वगळणे योग्य आहे याला कोणाचाही विरोध नाही आणि नसावा.परंतू रेगूलर मतदारांची आणि विशिष्ट लोकांची नावे काही कारण नसताना वगळणे योग्य नाही.मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात याचिका दाखल करण्यात आली आहे व दाखल केलेली याचिका ऐकण्यास सर्वोच्च न्यायालयाने सहमती दर्शवली आहे.यात ज्ञानेश कुमार यांनी इतर दोन निवडणूक आयुक्तांच्या मंजुरी शिवाय भारतीय निवडणूक आयोगाच्या नावाने अनेक निर्णय घेतले असा आरोप याचिकेत करण्यात आला आहे. यावर सर्वोच्च न्यायालयात पुढील आठवड्यात सुनावणी होण्याची शक्यता आहे. मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षणाच्या (एसआयआर) प्रक्रियेत भाजपचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण आडवाणी, परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर, माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड, दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आणि निवडणूक आयुक्त एस. एस. संधू यांच्यासह अनेक प्रमुख मतदारांच्या नोंदींमध्ये विसंगती आढळल्याने त्यांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत.म्हणजे आतापर्यंत ज्या नेत्यांनी अनेक दशके मतदान केले त्यांच्या मतदारांच्या नोंदीमध्ये विसंगती येत असेल तर देशाच्या करोडो नागरिकांचे काय ?याचे उत्तर ज्ञानेश कुमार यांनी प्रथम द्यायला हवे.तीन मुख्य निवडणूक आयुक्त असतांना फक्त स्वतःचा निर्णय ग्राह्य धरने म्हणजे ज्ञानेश कुमार यांची मनमानीच म्हणावी.त्यामुळे आता ज्ञानेश कुमार यांची सखोल चौकशी करून योग्य निर्णय घेण्याची वेळ आली.कारण ज्ञानेश कुमार यांच्या अनेक चुकीच्या निर्णयामुळे निवडणूक आयोगाच्या एसआयआर प्रक्रियेवर आणि निवडून प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहेत. त्यामुळे ज्ञानेश कुमार हे कोणाच्या सांगण्यावरून काम करीत होते याबद्दल सुद्धा कारवाई झाली पाहिजे व उघडकीस आले पाहिजे. कारण ज्ञानेश कुमार यांच्यावर कारवाई झाली नाही तर लोकांचा निवडणूक आयोगावरील विश्वास उडायला वेळ लागणार नाही. निवडणूक आयोगाच्या चुकीच्या धोरणांमुळेच देशात पक्ष फुटी, आमदार-खासदार फुटी, वाटेल तेव्हा मुख्यमंत्री पदाची शपथ घेणे व घोडेबाजार या संपूर्ण घटनांचे प्रमाण देशात मोठ्या प्रमाणात वाढले आहेत.हा सर्व प्रकार सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे निर्माण झाला आहे आणि आता निवडणूक आयोगाच्या चुकीच्या धोरणाचे प्रायश्चित्त देशाच्या १४५ कोटी जनतेनी का म्हणून भोगावे? असे अनेक प्रश्न सध्याच्या परिस्थितीत उपस्थित होत आहेत. त्यामुळे मी महामहीम राष्ट्रपती व सुप्रीम कोर्ट यांना विनंती करतो की, निवडणूक प्रक्रियेतील एसआयआर मध्ये सुरू असलेला घोळ ताबडतोब थांबवून संपुष्टात आणावा व ज्ञानेश कुमार किंवा अन्य दोषींवर कठोर कारवाई करून संविधानिक पदावरून बर्खास्त करण्याचा निर्णय घ्यावा. यामुळे मतदारांना व लोकशाहीला योग्य न्याय मिळण्यास मोठी मदत होईल. जय हिंद!



**रमेश कृष्णराव लांजेवार**
(स्वतंत्र पत्रकार)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात गांधी व शास्त्री जयंती उत्साहात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.




महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर नवले यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित कार्यक्रमात महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी त्यांच्या कायार्चे, विचारांचे आणि देशाच्या जडणघडणीतील योगदानाचे स्मरण करण्यात आले.

कार्यक्रमात स्वच्छता आणि अहिंसा या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. महात्मा गांधी यांनी दिलेला सत्य, अहिंसा आणि स्वच्छतेचा संदेश आजच्या काळातही तितकाच महत्त्वाचा असून विद्यार्थ्यांनी हे विचार आपल्या दैनंदिन जीवनात आचरणात आणावेत, असे आवाहन करण्यात आले. तसेच लालबहादूर शास्त्री यांचे साधेपण, प्रामाणिकपणा, देशप्रेम आणि 'जय जवान, जय किसान' हा संदेश विद्यार्थ्यांसाठी सदैव प्रेरणादायी असल्याचे सांगण्यात आले. यावेळी ग्रंथपाल गणेश घोगले, विद्यानंद बाबर, ग्रंथालय सेवक सचिन भानवसे यांच्यासह महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना राष्ट्रपुरुषांच्या विचारांचा आदर्श घेऊन सामाजिक जबाबदारी, स्वच्छता आणि अहिंसेची मूल्ये जपण्याचा संदेश देण्यात आला.

# नवरात्रौत्सवाच्या पार्श्वभूमीवर पोलीस दलाचे मॉकड्रिल

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** आगामी शारदीय नवरात्रौत्सव शांततेत व निर्विघ्नपणे पार पडावा तसेच शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहवी यासाठी पंढरपूर शहर पोलीस दल पूर्णपणे सतर्क झाले असून, कोणत्याही आपत्कालीन किंवा अनुचित प्रसंगी पोलीस दल घटनास्थळी वेळेत आणि कसे पोहोचते याची चाचपणी करण्यासाठी आज बुधवारी (दि.७) श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसरात मॉकड्रिल राबविण्यात आले.



नवरात्रौत्सवात शांतता व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्यावर वेळीच नियंत्रण कसे मिळवायचे याबाबत पंढरपूर शहर पोलीस दलाकडून मॉकड्रिल करण्यात आले. यावेळी चित्त थरारक प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून रंगीत तालीम करण्यात आली. उत्सवाच्या काळात अनेकदा जमावाची परिस्थिती उद्भवते ही परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांना कुठल्या परिस्थितीत कशा प्रकारची पावले उचलावयाची याबाबत शहर पोलीस निरीक्षक महेश ढवाण यांच्या उपस्थितीत श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसर येथे मॉकड्रिल केली. या मोहिमेत सहाय्यक पोलीस निरीक्षक अशोक सावजी, दत्तात्रय लेंडवे यांच्यासह १३ पोलीस ठाणे अंमलदार, शीघ्र कृती दलाचे १० जवान, दंगा काबु पथकाचे १६ जवान, बॉम्बशोधक व नाश पथकाचे १० जवान तर वाहतूक शाखेचे ०६ पोलीस कर्मचारी यांनी सहभाग घेतला होता.

# विडी कामगारांना किमान वेतन ७९४ रुपये प्रतिदिन

## लाल बावटा विडी कामगार युनियनकडून केंद्राच्या निर्णयाचे स्वागत

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** देशातील सुमारे एक कोटी विडी कामगारांसाठी केंद्र सरकारच्या कामगार विभागाने १ ऑक्टोबर २०२६ पासून लागू होणारे किमान वेतन व महागाई भत्ता जाहीर केला आहे. या निर्णयामुळे विडी कामगारांना मोठा दिलासा मिळणार असून, सोलापूर महानगरपालिका क्षेत्राचा 'ब' परिमंडळात समावेश करण्यात आला आहे.

केंद्र शासनाने विडी उद्योगातील कामगारांसाठी 'अ', 'ब' आणि 'क' अशा तीन परिमंडळांनुसार तसेच कुशल, अर्धकुशल आणि अकुशल श्रेणीनुसार किमान वेतन निश्चित केले आहे. त्यानुसार सोलापूर शहरातील अर्धकुशल विडी कामगारांसाठी मूळ वेतन ४९४ रुपये आणि महागाई भत्ता ३०० रुपये, असे एकूण ७९४ रुपये प्रतिदिन किमान वेतन निश्चित करण्यात आले आहे.

'अ' परिमंडळात मुंबई, दिल्ली, पुणे आदी शहरांचा समावेश असून, तेथील अर्धकुशल कामगारांसाठी मूळ वेतन व महागाई भत्त्यासह ९३३ रुपये प्रतिदिन किमान वेतन निश्चित करण्यात आले आहे. तर 'क' परिमंडळातील अर्धकुशल कामगारांसाठी मूळ वेतन ४१० रुपये व महागाई भत्ता २५१ रुपये, असे एकूण ६६१ रुपये प्रतिदिन किमान वेतन जाहीर करण्यात आले आहे.

विडी उद्योगातील चेकर, पान वाटप करणारे, तंबाखू वाटप करणारे तसेच विडी पॅकिंग करणारे कामगार यांचा अकुशल कामगारांच्या श्रेणीत समावेश करण्यात आला आहे. सोलापूरचा 'ब' परिमंडळात समावेश असल्याने या अकुशल कामगारांसाठी मूळ वेतन ४३७ रुपये व महागाई भत्ता २६७ रुपये, असे एकूण ७०४ रुपये प्रतिदिन किमान वेतन निश्चित करण्यात आले आहे.

याशिवाय लिपिक, हेड चेकर आणि ड्रायव्हर या पदांसाठी ९३३ रुपये प्रतिदिन किमान वेतन निश्चित करण्यात आले आहे. तर व्यवस्थापक, शाखा अधिकारी आणि लेखापरीक्षक यांच्यासाठी महागाई भत्त्यासह १,०२४ रुपये प्रतिदिन किमान वेतन जाहीर करण्यात आले आहे.

विडी कामगारांना आर्थिक दारिद्र्यातून बाहेर काढण्यासाठी आणि त्यांच्या श्रमाला न्याय्य मोबदला मिळवून देण्यासाठी केंद्र सरकारच्या कामगार विभागाने घेतलेला हा निर्णय महत्त्वपूर्ण आहे. या निर्णयाचे लाल बावटा विडी कामगार युनियन (CITU), सोलापूरच्या वतीने स्वागत करण्यात आले.

युनियनचे अध्यक्ष माजी आमदार कॉ. नरसय्या आडम (मास्तर) आणि जनरल सेक्रेटरी कॉ. एम. एच. शेख यांनी केंद्र शासनाच्या या निर्णयाचे जाहीर अभिनंदन केले असून, विडी कामगारांच्या किमान वेतनाची प्रभावी अंमलबजावणी करण्याची मागणीही केली आहे.

## दुष्काळ दौरा

दुष्काळ वणवा, पिके ती जाळली
कृश झाले देह, स्वप्ने ही वाळली

हताश होऊनी, अन्नदाता मरे
शासनाच्या पुढे, पैशासाठी झुरे

मदत मिळण्या, पोशिंद्याचा टाहो
निष्ठूर ते नेते, देव त्यांना पाहो

सत्तेच्या गादीत, नेते मालामाल
कधी कळणार, शेतकरी हाल

कुंभ मेळा खर्च, लावता ना मेळ
शेतीला मदत, लावू नका वेळ

मदत मागणी, करी शेतकरी
शासनाच्या तेंव्हा, येते जीवावरी

बळे बळे मग, त्यांचा दौरा ठरे
दिला जातो शब्द, काय त्यांचे खरे

गोड गोड बोल, गप्पा झाल्या फार
आता तरी खोला, तिजोरीचे दार

देतो देतो म्हणे, मदतीचा हात
बोलाचीच कढी, बोलाचाच भात

शेती बांधावर, उभा दौरेकरी
दुष्काळ पाहणी, लांबूनच करी

नका लागू देऊ, हात पाया माती
करुनी मदत, जपा जरा नाती



**श्री.युवराज गोवर्धन जगताप**
काटेगाव ता :- बार्शी
जिल्हा :- सोलापूर
8275171227

पान १ वरून

## दक्षिण सोलापुरातील सहा तलावांत...

लहरीपणामुळे दक्षिण सोलापूर तालुक्यातील अनेक भागांत पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण झाली होती. भूजल पातळी खालावल्याने पिण्याच्या पाण्यासह शेती आणि जनावरांच्या पाण्याचा प्रश्न गंभीर झाला होता. अनेक तलाव कोरडे पडल्याने पशुपालकांसमोरही मोठे संकट निर्माण झाले होते. या पार्श्वभूमीवर संबंधित प्रशासन आणि यंत्रणांच्या प्रयत्नातून उजनी धरणाचे पाणी या सहा प्रमुख तलावांमध्ये सोडण्यात आले. तलावांमध्ये पाणी पोहोचल्याने भूजल पातळी वाढण्यास मदत होणार असून, परिसरातील विहिरी आणि बोअरवेलच्या पाणीपातळीतही सुधारणा होण्याची अपेक्षा आहे. उजनीचे पाणी मिळाल्यामुळे शेतीसाठी तसेच पशुधनासाठी उपलब्ध पाण्याचा प्रश्न काही प्रमाणात सुटणार आहे. त्यामुळे दक्षिण सोलापूर तालुक्यातील शेतकरी आणि ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## सरकारचे 2 मंत्री....

"आपल्या सर्वांना एक गोष्ट सांगायची आहे, अंदाज असा आहे की, उद्या दुपारी आपल्या सर्वांना भेटण्यासाठी दोन मंत्री येणार आहेत. शंभर टक्के मार्ग काढला जाईल. हा लढा तुमच्यामुळे आपण लढू शकलो. अनेक नेते पाठिंबा देण्यासाठी आले म्हणून या ठिकाणी लढू शकलो", असं रोहित पवार बुधवारी संध्याकाळी म्हणाले.

**विद्यार्थ्यांचे आंदोलक हायजॅक, मुख्यमंत्र्यांचा आरोप**

दुसरीकडे, विद्यार्थ्यांचे आंदोलन हायजॅक झाल्याचा आरोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. "एमपीएससीच्या विद्यार्थ्यांचे आंदोलन हे हायजॅक झालेलं आहे. ते आता पूर्णपणे राजकीय नेत्यांचं आंदोलन झालं आहे. एमपीएससीच्या विषयापेक्षा त्या ठिकाणी वेगवेगळ्या राजकीय विषयांवर भाषणं होऊ लागली आहेत. एमपीससीचा विषय असताना पंतप्रधान नरेंद्र मोदींचा विषय, देशाचा विषय, वेगवेगळे विषय त्या ठिकाणी येत आहेत, जे पूर्णपणे राजकीय आहेत", असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## पंतप्रधान मोदी यांच्या प्रतिमेला जोडे मार करून काँग्रेसचे निदर्शने...

आवाजही दाबता येणार नाही.

लोकशाहीच्या मार्गाने प्रश्न विचारणाऱ्या विरोधकांना अटक करून सरकारला जनतेच्या प्रश्नांपासून पळ काढता येणार नाही. मतदारांच्या अधिकारांशी कोणतीही तडजोड केली जाणार नाही. मुख्य निवडणूक आयुक्तांच्या राजीनाम्याच्या मागणीसह निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेसाठी आमचा लढा सुरूच राहील, असेही चेतनभाऊ नरोटे यांनी स्पष्ट केले.

यावेळी जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार, माजी महापौर संजय हेमगड्डी, अरिफ शेख, सुशीलाताई आबुटे, माजी स्थायी समिती चेअरमन बाबा मिस्त्री, नगरसेवक प्रा. नरसिंह आसादे, कार्याध्यक्ष हणमंतु सायबोळु, महिला अध्यक्ष प्रमिलाताई तूपलवंडे, अल्पसंख्याक विभागाचे अध्यक्ष जुबेरभाई कुरेशी, सेवादल अध्यक्ष भीमाशंकर टेकाळे, मागासवर्गीय विभाग अध्यक्ष सागर उबाळे, मीडिया सेल अध्यक्ष तिरुपती परकीपडंला, रोजगार बेरोजगार विभाग अध्यक्ष रुपेश गायकवाड, यंग ब्रिगेड अध्यक्ष विवेक कन्ना, असंघटित कामगार सेल अध्यक्ष सुभाष वाघमारे, विचार सेल अध्यक्ष ॲड. करीमुन्नीसा बागवान, माजी नगरसेवक दत्तु अण्णा बंदपट्टे, सिद्धाराम चाकोते, हरुण शेख, एन. के. क्षिरसागर, रमेश कैरमकोंडा, ब्लॉक अध्यक्ष दिनेश म्हेत्रे, शिवशंकर आंजनाळकर, उपाध्यक्ष विश्वनाथ साबळे, शकील मौलवी, बसवराज म्हेत्रे, अंबादास गुत्तीकोंडा, रामसिंग आंबेवाले, ॲड. केशव इंगळे, हासिब नदाफ, गणेश आप्पा नरोटे, मोतीराम चव्हाण, सुरेश हावळे, रमेश फुले, नागेश म्याकल, संजय गायकवाड, पृथ्वीराज नरोटे, संस्कार नरोटे, अय्याज आळंद, शाफी हुंडेकरी, भीमराव शिंदे, मोहसीन फुलारी, माजी महिला अध्यक्ष हेमाताई चिंचोळकर, शोभा बोबे, मुमताज तांबोळी, ज्योती गायकवाड, अंजली मगोंडेकर, रेखा बिनेकर, छाया हिरवटे, धनलक्ष्मी देशमाने, सॉमसन दिनकर, प्रकाश गेंट्याल, रफिक चकोले, राजेश झंपले, नूरअहमद नलवार, ऐजाज बागवान, अस्लम शेख, दशरथ सामल, व्यंकटेश बोमेन, प्रतिक शिंगे, जितराज गरड, शिवाजी साळुंखे, आप्पा सलगर, चंद्रकांत टिक्के, गुलाम शेख, राजकुमार राठोड, ॲड. लक्ष्मण बनसोडे, शुकुर शेख, अभिलाष अच्युगटला, अमिद पाटील, नंदकुमार परदेसी, पवन सग्गम, जब्बर शेख, आनंद तावटे, आयन नडिवले, सचिन सुरवसे, सुरेश पडणुरे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## वात्रटिका

### तेरावा महिना

अंदाज पावसाचा ऐकून
आमचा तर विश्वास तुटला...
उन्हाळा अजून संपला नाही
ऑक्टोंबर हीट ने घाम फुटला...
पिके कधीच करपून गेली
एकदाच धूर आणि जाळ आहे...
नशिबात यंदाच्या सालात
तेरावा महिना नि दुष्काळ आहे...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# मुंबई नागपाडा जिमखाना ठरला 'उद्योग महर्षि' चषकाचा मानकरी



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** येथील उदयसिंह क्रीडा मंडळाच्या वतीने आयोजित निमंत्रित बास्केटबॉल स्पर्धेत मुंबईच्या नागपाडा जिमखाना संघाने आपल्या उत्कृष्ट क्रीडाकौशल्याच्या जोरावर अजिंक्यपद पटकावले. अत्यंत रोमहर्षक आणि अटीतटीच्या ठरलेल्या अंतिम सामन्यात नागपाडा जिमखाना संघाने नेक्सस नांदेड संघावर ९४ विरुद्ध ८६ अशा ८ गुणांच्या फरकाने मात करत 'उद्योग महर्षी चषका'वर आपले नाव कोरले.

उद्योग महर्षी स्व. उदयसिंह मोहिते-पाटील यांच्या जयंतीचे औचित्य साधून विजयसिंह मोहिते-पाटील क्रीडा संकुलात २ ते ४ ऑक्टोबर दरम्यान या राज्यस्तरीय बास्केटबॉल स्पधेर्चे भव्य आयोजन करण्यात आले होते. देशभरातील नामांकित १६ संघांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता.

**उपांत्य फेरीचा संग्राम:** सकाळच्या सत्रात पार पडलेल्या पहिल्या उपांत्य सामन्यात नेक्सस नांदेड संघाने एस.के.बी.ए. पुणे संघाचा ७१-५२ (१९ गुणांनी) असा पराभव करत अंतिम फेरीत धडक मारली. तर दुसऱ्या उपांत्य सामन्यात नागपाडा मुंबईने जैन युनिव्हर्सिटी बंगळुरू संघाला ५६-५२ (४ गुणांनी) असे पराभूत करत अंतिम फेरी गाठली.

अंतिम सामना आणि उपविजेतेपद: सायंकाळच्या सत्रात प्रेक्षकांच्या उकळत्या उत्साहात नागपाडा मुंबई विरुद्ध नेक्सस नांदेड असा अंतिम सामना रंगला. सुरुवातीपासूनच दोन्ही संघांमध्ये जोरदार चुरस पाहायला मिळाली, मात्र मोक्याच्या क्षणी नागपाडा जिमखानाने ८ गुणांची आघाडी घेत ९४-८६ अशा फरकाने ऐतिहासिक विजय

स्पर्धेतील विजेत्या संघांना महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या शुभहस्ते रोख रक्कमा आणि चषक देऊन गौरविण्या आले:

प्रथम क्रमांक (विजेता): नागपाडा जिमखाना, मुंबई — ₹७१,००० व चषक

**द्वितीय क्रमांक (उपविजेता):** नेक्सस नांदेड — ₹५१,००० व चषक

**तृतीय क्रमांक:** एस.के.बी.ए. पुणे (बंगळुरूला ५६-५१ असे ५ गुणांनी हरवून) — ₹३१,००० व चषक

**चतुर्थ क्रमांक:** जैन युनिव्हर्सिटी, बंगळुरू — ₹२१,००० व चषक

या पारितोषिक वितरण सोहळ्याला मदनसिंह मोहिते-पाटील, स्वयंप्रभादेवी मोहिते-पाटील, खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, माजी खासदार रणजितसिंह मोहिते-पाटील, सत्यप्रभादेवी मोहिते-पाटील, अकलूजच्या नगराध्यक्षा रेश्मा अडगळे, उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते-पाटील, देवन्या मोहिते-पाटील, सर्व सन्माननीय नगरसेवक आणि मोठ्या संख्येने क्रीडारसिकांची उपस्थिती लाभली होती.

# राज्य शिवाचार्य महासभेच्या अध्यक्षपदी नंदिकेश्वर शिवाचार्यांची निवड



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** श्री क्षेत्र मन्मथ स्वामी देवस्थान कपिलधार मांजरसुंबा येथे आयोजित वीरशैव लिंगायत शिवाचार्य महासभेत राज्य अध्यक्षपदी श्री. ष. ब्र. १०८ तपोरत्न नंदिकेश्वर शिवाचार्य महास्वामीजी सोनपेठकर यांची एकमताने निवड करण्यात आली.

अखिल भारतीय वीरशैव शिवाचार्य संस्थेचे उपाध्यक्ष श्री. ष. ब्र. १०८ श्रीकंठ शिवाचार्य महास्वामीजी नागणसूर (सोलापूर) यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्रातील शिवाचार्यांची बैठक झाली.यावेळी नूतन कार्यकारणीची एकमताने निवड करण्यात आली.

या बैठकीत वीरशैव लिंगायत शिवाचार्य महासभेच्या राज्य अध्यक्षपदी श्री. ष. ब्र. १०८ तपोरत्न नंदिकेश्वर शिवाचार्य महास्वामीजी( सोनपेठ) यांची एकमताने निवड करण्यात आली तसेच कार्याध्यक्षपदी श्री. ष. ब्र. १०८ शिवाचार्य रत्न डॉ शंभुलिंग शिवाचार्य महास्वामीजी (उदगीर) तर उपाध्यक्षपदी श्री. ष. ब्र. १०८ गुरुपादेश्वर शिवाचार्य महास्वामीजी (गिरगाव) व सचिवपदी श्री ष ब्र १०८ डॉ. विरुपाक्ष शिवाचार्य महास्वामीजी (मुखेड) व तसेच कोषाध्यक्षपदी श्री. ष. ब्र. १०८ महादेव शिवाचार्य महास्वामीजी (वाई) आणि प्रवक्ते म्हणून श्री. ष. ब्र. १०८ अमृतेश्वर शिवाचार्य महास्वामीजी (जिंतूर) व तसेच श्री. ष. ब्र. १०८ दिगंबर शिवाचार्य महास्वामीजी (वसमत) आदींची निवड करण्यात आली.यावेळी महाराष्ट्रातील बहुसंख्य शिवाचार्यगण उपस्थित होते. यावेळी श्रीकंठ शिवाचार्य महास्वामीजी आशीर्वचनात म्हणाले,वीरशैव लिंगायत शिवाचार्य महासभेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील सर्व मठ मंदिर संस्थानांचे जतन करणे, धर्म आणि संस्कृतीचे संरक्षण करणे, शास्त्र चिंतन व प्रवचनाचे आयोजन करणे, विविध मठावर मठाधिपतीची नियुक्ती करणे, गरजू विद्यार्थ्यांना मदत करणे, समाज प्रबोधन करणे, आपत्ती प्रसंगी मदत करणे आदी उद्देशाने तसेच वीरशैव लिंगायत संप्रदाय वाढविण्यासाठी प्रयत्न केला जाणार असल्याचे सांगितले.यावेळी नागणसूर महास्वामीजी यांच्या हस्ते राज्य नव नियुक्त कार्यकारिणीच्या पदाधिकाऱ्यांचे गौरव करण्यात आले.

# अपूर्ण राहिलेल्या निरोपाला पूर्णत्व
## शिवरत्नच्या विद्यार्थ्यांचा सामाजिक उपक्रम



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** गणेशोत्सवानंतर नीरा नदीपात्रात भग्न अवस्थेत पडलेल्या गणेशमूर्ती पाहून शिवरत्न शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा शीतलदेवी धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांनी पुढाकार घेत एक आगळावेगळा सामाजिक उपक्रम राबविला.

शितलदेवी मोहिते पाटील या पुण्याकडे जात असताना सराटी येथील नीरा नदीच्या पुलावरून नदीपात्रात मोठ्या संख्येने गणेशमूर्ती भग्न अवस्थेत पडलेल्या दिसून आल्या. भक्तिभावाने प्रतिष्ठापना केलेल्या या मूर्तींची अशी अवस्था पाहून शीतलदेवी मोहिते-पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या माध्यमातून या मूर्ती नदीपात्रातून बाहेर काढून त्यांचे सन्मानपूर्वक पुनर्विसर्जन करण्याचा विचार व्यक्त केला.

त्यानुसार शिवरत्न इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, ग्रीन फिंगर्स कम्प्युटर अँड सायन्स कॉलेज ग्रीन फिंगर्स कम्प्युटर अँड सायन्स कॉलेज तसेच विजयसिंह मोहिते-पाटील नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी पुढाकार घेतला. विद्यार्थी, प्राध्यापक व सहकाऱ्यांनी नदीपात्रात उतरून अस्ताव्यस्त पडलेल्या भग्न गणेशमूर्ती बाहेर काढल्या. त्यानंतर या मूर्तींचे योग्य ठिकाणी सन्मानपूर्वक पुनर्विसर्जन करण्यात आले.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी श्रद्धेचा सन्मान, सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरण संवर्धन यांचा सुंदर समन्वय साधला. गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना ज्या श्रद्धेने केली जाते, त्याच भावनेने त्यांना सन्मानपूर्वक निरोप देणे हीदेखील आपली सामाजिक जबाबदारी असल्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

'अपूर्ण राहिलेल्या निरोपाला पूर्णत्व' देणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी सामाजिक जाणीव आणि संवेदनशीलतेचा प्रत्यक्ष अनुभव ठरला.श्रद्धा जपत नदीचेही संवर्धन करण्याचा संदेश देणाऱ्या या उपक्रमात विद्यार्थ्यांनी घेतलेला पुढाकार समाजासाठी अनुकरणीय ठरला.

# जिजाऊ ज्ञान मंदिर व विजयसिंह मोहिते पाटील महाविद्यालयाच्या १० विद्यार्थ्यांची निवड



**कोंडी, (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हा क्रीडा विभागाच्या संयुक्त विद्यमाने उत्तर सोलापूर तालुकास्तरीय कुस्ती, कराटे व योगासन स्पर्धा जिजाऊ ज्ञान मंदिर इंग्लिश मिडियम स्कूल, कोंडी येथे नुकत्याच पार पडल्या. या स्पर्धेत जिजाऊ ज्ञान मंदिर इंग्लिश मिडियम स्कूल व विजयसिंह मोहिते पाटील कनिष्ठ महाविद्यालय, कोंडी येथील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवत जिल्हास्तरीय स्पधेर्साठी निवड मिळवली आहे.

**यशस्वी विद्यार्थ्यांची नावे –**

योगासन (१७ वर्षे मुले) – आविष्कार प्रसेंजीत काटे (प्रथम), धनराज रमेश साठे (तृतीय)

योगासन (१९ वर्षे मुले) – शंभुराजे नागेश जाधव (प्रथम), राजवीर विठ्ठल भोसले (द्वितीय), प्रवीण देवीदास जाधव (तृतीय)

योगासन (मुली) – संध्या ज्योतिबा रणदिवे (प्रथम), अक्षरा दिनकर साठे (तृतीय)

कराटे (१४ वर्षे, ३० किलो मुली) – स्वरा विरेश शिनगारे (प्रथम) – जिल्हास्तरीय निवड

कुस्ती (१७ वर्षे मुले – ग्रेको रोमन) – जीशान जावेद शेख (६८ किलो – प्रथम), गुरुराज कृष्णात भोसले (८० किलो – प्रथम)

कुस्ती (१९ वर्षे मुले) – ओमराज क्षिरसागर (६३ किलो – प्रथम)

कुस्ती (१९ वर्षे मुली) – कार्तिकी नागनाथ दळवे (५२ किलो – प्रथम), प्राजक्ता रमेश निंबाळकर (५५ किलो – प्रथम), आकांक्षा अनिल शिंदे (६३ किलो – प्रथम)

तसेच कबड्डी स्पर्धेत (१९ वर्षे मुली) महाविद्यालयाच्या संघाने तृतीय क्रमांक पटकावला.

या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष गणेश निळ म्हणाले, "यशाच्या मार्गावर अनेकजण असतात, पण यश मिळवणारे कमी असतात. आमच्या विद्यार्थ्यांनी उत्तुंग भरारी घेतली आहे. त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन."

प्राचार्य सुषमा निळ म्हणाल्या, "पक्षाला भरारीसाठी पंख लागतात, तसे विद्यार्थ्यांना भरारीसाठी शिक्षक रूपी पंख लागतात. सर्वांना पुढील जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी लाख लाख शुभेच्छा."

या सर्व विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक दिलीप भोसले यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी मुख्याध्यापिका अर्चना औरादे, रवी कोतकुंडे, प्रतीक्षा खुणे आदी शिक्षक उपस्थित होते.

# राजीव गांधी सानुग्रह अपघात अनुदान योजनेतून १९ विद्यार्थ्यांच्या पालकांना डीडीचे वाटप



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** इयत्ता पहिली ते बारावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा अपघाती मृत्यू झाल्यास किंवा अपघातामुळे त्यांना दुखापत झाल्यास त्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक आधार मिळावा, यासाठी राज्य शासनाच्या वतीने राजीव गांधी सानुग्रह अपघात अनुदान योजना राबविण्यात येते. या योजनेंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील सन २०२६-२७ मधील १९ विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत मंजूर करण्यात आली आहे.

जिल्हा परिषद सोलापूरच्या शिक्षण विभागातील योजना कार्यालयामार्फत मंजूर करण्यात आलेल्या या आर्थिक मदतीचे डीडी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांच्या हस्ते संबंधित विद्यार्थ्यांच्या पालकांना वितरित करण्यात आले.

योजनेनुसार अपघाती मृत्यू झालेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना दीड लाख रुपयांपर्यंत, तर अपघातामुळे दुखापत झालेल्या विद्यार्थ्यांच्या वैद्यकीय उपचारांसाठी एक लाख रुपयांपर्यंत आर्थिक मदत शासनाकडून दिली जाते. त्यामुळे अपघातासारख्या संकटाच्या प्रसंगी विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना उपचाराचा खर्च तसेच इतर आर्थिक अडचणींचा सामना करण्यासाठी काही प्रमाणात आधार मिळतो.

जिल्ह्यातील पात्र विद्यार्थ्यांच्या प्रकरणांची कार्यवाही पूर्ण करून मंजूर झालेल्या अनुदानाचे डीडी पालकांकडे सुपूर्द करण्यात आले. शासनाच्या या मदतीमुळे संकटाच्या काळात संबंधित कुटुंबीयांना आर्थिक हातभार मिळाला.

यावेळी शिक्षणाधिकारी (योजना) सुजित शिंदे, उपशिक्षणाधिकारी (योजना) अर्चना जनबंधू, पांडुरंग घोगरे यांच्यासह शिक्षण विभागातील संबंधित अधिकारी उपस्थित होते.

**जाहिर प्रसिध्दीकरण** दि.कि.अर्ज नं. ५०/२०२६ नि.नं.७

**मोहोळ येथील मे. सिव्हिल जज्ज, ज्युनिअर डिव्हिजन सो यांचे कोर्टात**

१) श्रीमती भाग्यश्री विनायक हाके
वय-२७ वर्षे, धंदा- घरकाम,
रा. जामगांव खुर्द, ता.मोहोळ, जि. सोलापूर. } अर्जदार
२) चि. समर्थ विनायक हाके,
वय - ३ वर्षे, अज्ञान, अ.पा. क. अर्जदार नं. १
इष्टमित्र आई श्रीमती भाग्यश्री विनायक हाके,

विरूध्द

कोणी नाही }सामनेवाला

ज्याअर्थी यातील अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज ते मयत लता कामण्णा हाके यांचे वारस आहेत हे ठरवुन मिळणेसाठी व अर्जदार नं. १ हिस भविष्य निर्वाह निधी, ग्रॅज्युटी मिळणेसाठी तसेच पुढील शासकीय कामकाजासाठी व अर्जदार नं. १ हिस अनुकंपा तत्वाखाली नोकरी मिळणेसाठी त्यांचे नांवे वारस सर्टिफिकेट मिळणेसाठी या मे. कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी यातील वर नमुद अर्जदार यांच्या व्यतीरिक्त कोणी वारस मयत लता कामण्णा हाके यांना असल्यास अथवा अर्जदार नं. १ यांना अनुकंपा तत्वावर नोकरी मिळण्यास कोणाचा कसला हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन एक महिन्याच्या आत अथवा दि. ०२/११/२०२६ रोजी समक्ष अथवा वकीलामार्फत कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत न आल्यास अर्जदारांना त्यांचे अर्जात मागणी प्रमाणे वारस सर्टीफीकेट दिले जाईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्क्यानीशी दिले असे ता. ०७/१०/२०२६

सही/- लिपीक | शिक्का | सही/- अधिक्षक, दिवाणी न्यायालय,क.स्तर,मोहोळ.

**जाहीर प्रसिध्दीकरण** दिवाणी किरकोळ अर्ज नं. ५४/२०२६ नि. ०७

**मोहोळ येथील मे. सिव्हील जज्ञ ज्युनिअर डिव्हीजन सो,यांचे कोर्टात**

१) श्री. विजय नागनाथ आदलिंगे, वय - ३१ वर्षे, धंदा-नोकरी, रा. अहिल्यानगर, कुंभारखाणी जवळ, मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर. २) चिं. समर्थ विजय आदलिंगे वय :-०५ वर्षे, धंदा-शिक्षण, रा. सदर ३) कु. स्वरा विजय आदलिंगे, वय :- ०२ वर्षे, धंदा-शिक्षण, रा. सदर अर्जदार नं. १ हा स्वत:साठी व अर्जदार नं. २ व ३ चे जनक पिता म्हणून } अर्जदार

**विरूद्ध**

कोणी नाही. } सामनेवाला

ज्या अर्थी अर्जदार नं. १ हे मयत सौ. लक्ष्मी विजय आदलिंगे यांचे पती आहेत. तसेच अर्जदार नं. २ व ३ हे सौ. लक्ष्मी विजय आदलिंगे हिचे अपत्ये आहेत. सौ. लक्ष्मी विजय आदलिंगे हिचा दि. २०/०४/२०२६ रोजी विद्युत शॉक लागुन झालेल्या अपघातामुळे दुर्दैवी मुत्यु झाला. सदर मृत्युबाबत महावितरणाकडे नुकसान भरपाई मिळविण्यासाठी मयत सौ. लक्ष्मी विजय आदलिंगे यांचे कायदेशीर वारस कोण आहेत, याची औपचारिक न्यायालयीन मान्यता आवश्यक आहे. अर्जदार नं. १ ते ३ यांचे याव्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाहीत असे वारस दाखला मिळण्यासाठी अर्जदार नं. १ ते ३ यांनी त्यांचे नांवे वारस दाखला मिळणेसाठी या मे. कोर्टात वरील नंबरप्रमाणे अर्ज केला आहे.

त्या अर्थी वरील मागणी बाबत जर कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी मोहोळ येथील सिव्हील जज्ञ ज्युनिअर डिव्हीजन सो, यांचे कोर्टात सदर प्रसिध्दिकरण झालेपासून ३० दिवसाचे आत किंवा मे. कोर्टानी नेमलेले ७/११/२०२६ रोजी हजर होवून स्वतः अथवा प्रतिनिधी मार्फत त्यांचे म्हणणे सादर करावे, जर मुदतीत कोणाची काही हरकत, न आल्यास अर्जदाराचे मागणीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल. हे जाहिर प्रसिध्दीकरण दिले असे ता. ७/१०/२०२६.

कोर्टाचा शिक्का | **न्यायालय अधिक्षक सि.ज.ज्यु.डि.मोहोळ.**

# पेनूर-कोन्हेरी रस्त्यावरील धोकादायक खड्डा तात्काळ बुजवा





**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** पेनूर-कोन्हेरी रस्त्यावर रस्त्यालगत मोठे भगदाड व खड्डा निर्माण झाल्याने रस्त्याची कड अत्यंत धोकादायक बनली आहे. या ठिकाणी मातीची धूप झाल्यामुळे वाहनचालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला असून, संभाव्य अपघात टाळण्यासाठी खड्डा तात्काळ बुजवून रस्त्याची कड मजबूत करावी, अशी मागणी शरद जोशी शेतकरी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

याबाबत संघटनेचे अध्यक्ष नितीन जरग यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मोहोळ येथील कार्यकारी अभियंत्यांना निवेदन दिले आहे.

पेनूर-कोन्हेरी मार्गावरून नागरिक, विद्यार्थी, दुचाकीस्वार तसेच इतर वाहनांची नियमित वर्दळ असते. विशेषतः रात्रीच्या वेळी हे धोकादायक भगदाड व खड्डा वाहनचालकांच्या सहज निदर्शनास न आल्यास गंभीर अपघात होऊन जीवितहानी होण्याची शक्यता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने संबंधित विभागाने तातडीने प्रत्यक्ष पाहणी करून खड्डा शास्त्रोक्त पद्धतीने बुजवावा, रस्त्याची कड मजबूत करावी तसेच आवश्यक सुरक्षा उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, प्रशासनाच्या निदर्शनास ही बाब आणून दिल्यानंतरही कार्यवाही न झाल्यास आणि त्यानंतर अपघात अथवा जीवितहानी झाल्यास, रस्त्याच्या देखभाल-दुरुस्तीची जबाबदारी असलेल्या यंत्रणेच्या निष्काळजीपणाबाबत वरिष्ठ प्राधिकरणाकडे तक्रार करण्यासह उपलब्ध कायदेशीर उपाययोजना करण्याचा इशाराही शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष नितीन जरग यांनी दिला आहे.

**आमच्याकडे केशर आंबा, हापूस,
मोठी फळझाडे, फुलझाडे, शोभिवंत झाडे,
इन डोअर गुलाब, बोन्साय, आरेकापाम इ.रोपे
होलसेल दरात विक्रीसाठी उपलब्ध.**
**मनोरमा रोपवाटिका, सोरेगाव, विजापूर रोड, सोलापूर**
**संपर्क - 9422602337, 8317212037**

## Classified - छोटी जाहीरात

### बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच
मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे
खोल पाण्याची विहीर खोदून
मिळेल. संपर्क –
शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस
रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)
### अथर्व पेस्ट कंट्रोल
An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी
सुभाष विरपे**
**9822964815
9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी,
डास, जाळी, माशी, ढेकुण,
उंदीर, घुस इ. नियंत्रण

### पाहिजेत
चिंचोळी MIDC,
सोलापूर शहर करिता
**सिक्युरिटी गार्ड**
त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ –
11:30 ते 2 वा.

### वर-वधू



**जन्मका जोडी विवाह
दुल्हन सूचना केंद्र**
सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र
**आमच्याकडे सगळ्या
समाजाच्या वधु-वर साठी
संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता.
अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) छ. शिवरायांवर आधारित रणजित देसाई लिखित कादंबरी २) कलर (मराठीत) ३) प्राथमिक शालेय पुस्तकांचे प्रकाशन करणारी संस्था ४) फळातील गोड द्रव ५) एक औषधी लाल रंगाचे कंदमूळ ६) बोलावण्यासाठीची आरोळी ७) धावपट्टू (इंग्रजीत) ८) भाजप नेते रावसाहेब दानवे या जिल्ह्यातील आहेत ११) पडीक जमीन १२) ग्राम, खेडे १३) लोक, रयत १५) श्रीगणेशाचे एक नाव १७) गुणाकारच्या विरूध्दार्थी शब्द १८) वत उलट लिहा २०) स्वभावाने रागीट २२) विषमच्या विरूध्दार्थी शब्द २४) रक्तवाहिनी २६) शिर्डी येथील प्रसिध्द देवस्थान २७) मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष संक्षिप्तमध्ये लिहा-*** २९) डांबरी रोड ३०) फिरकी गोलंदाज-यजुवेंद्र *** ३२) उत्सवाचा दिवस ३४) धांदल, गडबड ३५) कर्ज (इंग्रजीत) ३६) भाजप नेत्या-उमा *** ३८) शर्ट ३९) ब्रेड (मराठीत) ४१) मध्य मुंबईतील एक रेल्वे स्टेशन, जिना ४२) अफूप्रमाणे एक अंमली पदार्थ ४३) झाडाचे पर्ण ४४) जय-पराजय, हार-** ४५) प्रख्यात दिवंगत गायिका-** मंगेशकर ४७) याच्यापासून शिरा बनवितात

**आडवे शब्द :** १) शिवसेनेचे महाराष्ट्रातील एक खासदार ५) लालूप्रसाद मुख्यमंत्री होते ते राज्य ९) शोध, तपास १०) सल उलट लिहा ११) लगेच, लवकर १२) फळातील मुख्य गर १३) एक म्हण-नाकापेक्षा मोती ** १४) नव्वदच्या दशकातील एक अभिनेत्री-*** टंडन १६) देवतांनी दिलेला आशिर्वाद १७) शिजवलेला तांदूळ १९) श्रीकृष्णाने अर्जुनाला केलेला उपदेशपर ग्रंथ-भगवत ** २१) आ. सुमनताई पाटील यांचा विधानसभा मतदारसंघ २३) नय उलट लिहा २५) ओंजळ २८) याचे कणीस भाजून खातात २९) सत्वयुक्त, पौष्टीक ३०) बसण्यासाठी ही अंथरतात ३१) सक उलट लिहा ३३) लहानपण ३५) संसदेचे एक सभागृह ३७) बगिचा ३८) घर, निवास ४०) इराकची राजधानी ४२) गव्हाच्या पिठापासून बनवितात ती गोल *** ४४) प्राणप्रिय मित्र, जवळचे नाते ४६) दोघांमध्ये पडलेले अंतर, भेग (हिंदीत) ४८) क्रिकेटमधील धाव (इंग्रजीत) ४९) एक हिंदी चित्रपट-** मचाये शोर, चोऱ्या करणारा ५०) वडिलार्जित संपत्तीचा हक्कदार ५१) उन्हाळ्यातील एक महिना

## सुडोकु - 72

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | | 1 | | | 3 | 9 | | 6 |
| | | 9 | | | 7 | 8 | 5 | |
| 2 | 5 | | 1 | | | 4 | 7 | |
| 5 | | | | 6 | 1 | 7 | | 4 |
| 7 | 6 | | 8 | 3 | | | | |
| | 3 | 2 | | | | | | |
| | 2 | | | 1 | 9 | 5 | | |
| | | 5 | | | | 3 | | 2 |
| | | | 4 | 5 | 2 | 1 | 9 | 7 |

# महाराष्ट्र संपादक परिषदेचे राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार जाहीर

## विक्रम खेलबुडे यांच्यासह नऊ जणांचा समावेश

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र संपादक परिषदेच्या वतीने ज्येष्ठ पत्रकार स्वर्गीय यशवंत पाध्ये यांच्या जयंतीनिमित्त देण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. यंदाचा हा पुरस्कार सोलापूर श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष तथा दैनिक संचारचे उपसंपादक विक्रम खेलबुडे यांच्यासह राज्यातील नऊ जेष्ठ पत्रकारांना जाहीर झाला आहे.

महाराष्ट्रातील पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या पत्रकारांचा विविध विभागांतून या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. त्यामध्ये छत्रपती संभाजीनगर विभागातून दैनिक लोकमतचे नंदकिशोर पाटील, अमरावती विभागातून दैनिक हिंदुस्थानचे विलास मराठे, कोल्हापूर विभागातून दैनिक सकाळचे निखिल पंडितराव, ठाणे-पालघर विभागातून दैनिक पुण्यनगरीचे सुनील जावडेकर, शिर्डी-अहिल्यानगर विभागातून दैनिक सकाळचे सतीश वैजापूरकर, नांदेड विभागातून दैनिक पुढारीचे संजीव कुलकर्णी आणि जळगाव विभागातून दैनिक लोकशाहीचे डी. जे. गुरव यांचा समावेश आहे.

दैनिक प्रहारचे संपादक पद्मभूषण देशपांडे यांना विशेष पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. तसेच आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करून हजारो रुग्णांसाठी मदतीचा हात



ठरलेले पत्रकार मंगेश चिवटे यांनाही यावेळी विशेष सन्मानाने गौरविण्यात येणार आहे.

या पुरस्काराचे वितरण लवकरच राज्यातील विविध विभागांत मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. रोख रक्कम, गौरवचिन्ह, शाल आणि श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

या राज्यस्तरीय पुरस्कारांच्या निवड प्रक्रियेसाठी महाराष्ट्र संपादक परिषदेचे अध्यक्ष संजय मलमे, सचिव एकनाथ बिरवटकर, कार्याध्यक्ष प्रकाश कुलथे, उपाध्यक्ष सुधीर जाधव, सदस्य गजानन चव्हाण, खजिनदार दीपाताई पाध्ये यांच्यासह गोरख तावरे, अरुण सुरवाडकर, धोंडूपंत विष्णुपुरीकर, राजेंद्र मोहिते आणि अन्य सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

सोलापूर श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष म्हणून पत्रकारांच्या विविध प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा करणारे विक्रम खेलबुडे यांना राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल पत्रकारिता क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# पदवीधर-शिक्षक निवडणुकीसाठी 21 ऑक्टोबरला रामवाडी गोडाऊनमधून साहित्य वाटप- गणेश निऱ्हाळी

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदारसंघ निवडणूक 2026 पारदर्शक व नियोजनबद्ध पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज झाले असून निवडणूक साहित्य वाटपाचा आराखडा काटेकोरपणे तयार करावा आणि 21 ऑक्टोबर रोजी रामवाडी गोडाऊन येथे तालुकास्तरावर व 22 ऑक्टोबर रोजी मतदान केंद्रनिहाय साहित्य वाटप पूर्ण करावे, असे निर्देश अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी दिले.



जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पदवीधर-शिक्षक मतदारसंघ निवडणूक २०२६ च्या अनुषंगाने नोडल अधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीत ते मार्गदर्शन करत होते. यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी लक्ष्मण कसेकर, उपजिल्हाधिकारी संतोष कुमार देशमुख, प्रांताधिकारी सुमित शिंदे,

एनआयसीचे जिल्हा सूचना अधिकारी रवी पवार , जिल्हा पुरवठा अधिकारी ओंकार पडोळे, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय पाटील, सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी देठे, तहसीलदार महसूल दिनेश पारगे, तहसीलदार सरस्वती पाटील यांच्यासह संबंधित नोडल अधिकारी उपस्थित होते.

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार शिक्षक व पदवीधर मतदारसंघाच्या निवडणूक प्रक्रियेसाठी जिल्हा प्रशासनाने विविध विषयांसाठी स्वतंत्र नोडल अधिकारी नियुक्त केले आहेत. या अधिकाऱ्यांना आदर्श आचारसंहिता, कायदा व सुव्यवस्था, निवडणूक खर्च नियंत्रण, मतदान केंद्र व्यवस्थापन, मतदान कर्मचारी प्रशिक्षण, वाहन व्यवस्था, निवडणूक निरीक्षक व्यवस्था, निवडणूक साहित्य, मतदार यादी वितरण, मीडिया कक्ष, टपाली मतपत्रिका, मतपत्रिका छपाई व वाटप, संगणक व कम्युनिकेशन, जॉइंट चेकिंग, स्ट्राँग रूम व मतमोजणी केंद्राची तयारी, मतदान केंद्रांवरील आरोग्य सुविधा, जिल्हा आराखडा, भोजन व्यवस्था, स्वीप कार्यक्रम तसेच वेबकास्टिंग आदी कामांची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

### साहित्य वाटपाचा आराखडा काटेकोरपणे करावा - वाहन व्यवस्था व वेळापत्रक जाहीर

निवडणूक साहित्य वाटपाचा आराखडा काटेकोरपणे करावा, अशा सूचना अपर जिल्हाधिकारी यांनी दिल्या. उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी निवडणूक प्रक्रियेसाठी आवश्यक असणाऱ्या वाहनांची वेळेत व्यवस्था करावी व वाहतूक आराखडा तयार करावा.

निवडणूक साहित्याचे वाटप दि. 21 ऑक्टोबर रोजी रामवाडी गोडाऊन येथे तालुकास्तरीय यंत्रणांना करण्यात येईल. त्यानंतर दि. 22 ऑक्टोबर रोजी तालुकास्तरीय यंत्रणांनी निवडणुकीसाठी नियुक्त केलेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना मतदान केंद्रनिहाय निवडणूक साहित्याचे वाटप करावे, असे निर्देश देण्यात आले.

### आरोग्य, भोजन व स्वीपवर भर

मतदान केंद्रांवर आरोग्य सुविधा व भोजन व्यवस्था व्यवस्थितपणे असली पाहिजे, यासाठी आरोग्य विभाग व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने नियोजन करावे. महानगरपालिका व जिल्हा परिषदेने स्वीप कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करून मतदारांमध्ये जनजागृती करावी.

प्रत्येक अधिकाऱ्याने अत्यंत जबाबदारीने काम करून निवडणुका यशस्वीपणे पार पडतील, त्या पद्धतीने नियोजन ठेवावे, असे निर्देश अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी दिले.

### पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदार संघासाठी सोलापूर जिल्ह्यातील मतदान केंद्रांची तालुका निहाय माहिती अशी -

सोलापूर जिल्ह्यात एकूण १९३ मतदान केंद्रे असून त्यापैकी पदवीधरची ११७ व शिक्षकची ७६ केंद्रे आहेत.

२४४ करमाळा विधानसभा मतदार संघात पदवीधरची १० केंद्रे (क्र. १६१ ते १७०) व शिक्षकची ८ केंद्रे (क्र. ७३ ते ८०) अशी एकूण १८ केंद्रे. २४५ माढा मध्ये पदवीधरची १३ केंद्रे (१७१ ते १८३) व शिक्षकची ९ केंद्रे (८१ ते ८९) एकूण २२ केंद्रे. २४६ बार्शी मध्ये पदवीधरची ११ केंद्रे (१८४ ते १९४) व शिक्षकची ९ केंद्रे (९० ते ९८) एकूण २० केंद्रे. २४७ मोहोळ (रउ) मध्ये पदवीधरची ११ केंद्रे (१९५ ते २०५) व शिक्षकची ७ केंद्रे (९९ ते १०५) एकूण १८ केंद्रे. २४८ सोलापूर शहर उत्तर मध्ये पदवीधरची ८ केंद्रे (२०६ ते २१३) व शिक्षकची २ केंद्रे (१०६, १०७) एकूण १० केंद्रे. २४९ सोलापूर शहर मध्य मध्ये पदवीधरची ४ केंद्रे (२१४ ते २१७) व शिक्षकचे १ केंद्र (१०८) एकूण ५ केंद्रे. २५० अक्कलकोट मध्ये पदवीधरची १० केंद्रे (२१८ ते २२७) व शिक्षकची १० केंद्रे (१०९ ते ११८) एकूण २० केंद्रे. २५१ सोलापूर दक्षिण मध्ये पदवीधरची १० केंद्रे (२२८ ते २३७) व शिक्षकची ६ केंद्रे (११९ ते १२४) एकूण १६ केंद्रे. २५२ पंढरपूर मध्ये सर्वाधिक पदवीधरची १५ केंद्रे (२३८ ते २५२) व शिक्षकची ९ केंद्रे (१२५ ते १३३) एकूण २४ केंद्रे. २५३ सांगोला मध्ये पदवीधरची १२ केंद्रे (२५३ ते २६४) व शिक्षकची ९ केंद्रे (१३४ ते १४२) एकूण २१ केंद्रे. २५४ माळशिरस (रउ) मध्ये पदवीधरची १३ केंद्रे (२६५ ते २७७) व शिक्षकची ६ केंद्रे (१४३ ते १४८) एकूण १९ केंद्रे.

# भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या उपद्रवाच्या पार्श्वभूमीवर आढावा बैठक

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरातील भटक्या कुत्र्यांचा वाढता उपद्रव तसेच कुत्रा चावण्याच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर सोलापूर शहराचे महापौर विनायक दादा कोंड्याल यांच्या अध्यक्षतेखाली पशुवैद्यकीय विभाग व आरोग्य विभागाची आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सभागृह नेते नरेंद्र काळे, स्थायी समिती सभापती रंजीता चाकोते माजी महापौर श्रीकांचना यन्नम, नगरसेवक नारायण बनसोडे आरोग्य अधिकारी राखी माने पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. सतीश चौगुले डॉ. वाळवेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत भटक्या कुत्र्यांच्या नियंत्रणासाठी सुरू असलेल्या उपाययोजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

शहरातील नागरिकांची सुरक्षितता लक्षात घेऊन भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या संख्येवर नियंत्रण आणणे, कुत्रा चावण्याच्या घटना कमी करणे, निर्बीजीकरणाची कार्यवाही अधिक प्रभावी करणे आणि भटक्या कुत्र्यांचे मोठ्या प्रमाणावर अँटी-रेबीज लसीकरण करण्याबाबत बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.

पशुवैद्यकीय विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या प्राणी जन्मनियंत्रण (Animal Birth



Control - ABC) कार्यक्रमाची कार्यपद्धती, निबीर्जीकरण, पशुवैद्यकीय उपचार तसेच भटक्या कुत्र्यांचे अँटी-रेबीज लसीकरण याबाबत अधिकाऱ्यांकडून माहिती घेण्यात आली. शहरातील विविध भागांमध्ये निबीर्जीकरणाची कार्यवाही अधिक व्यापक स्वरूपात राबविण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या.

### विशेष अँटी-रेबीज लसीकरण मोहीम

रेबीज हा प्राणघातक मात्र प्रतिबंध करता येणारा आजार असल्याने भटक्या कुत्र्यांचे मोठ्या प्रमाणावर अँटी-रेबीज लसीकरण करणे आवश्यक असल्याचे बैठकीत नमूद करण्यात आले. त्यासाठी शहरात विशेष/मास अँटी-रेबीज लसीकरण मोहीम राबविण्याबाबत चर्चा करण्यात आली.

विभागनिहाय नियोजन करून अधिकाधिक भटक्या कुत्र्यांना लसीकरणाच्या कक्षेत आणणे, निबीर्जीकरण व लसीकरण कार्यक्रमाचा प्रभावी समन्वय साधणे तसेच संवेदनशील भागांमध्ये विशेष लक्ष केंद्रित करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

### आक्रमक व रेबीज संशयित कुत्र्यांबाबत विशेष उपाययोजना

रेबीज संशयित तसेच अत्यंत आक्रमक कुत्र्यांबाबत सुरक्षित पद्धतीने पकड, निरीक्षण, पशुवैद्यकीय तपासणी आणि लागू कायदे व नियमांनुसार पुढील कार्यवाही करण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली.

अशा प्रकरणांमध्ये नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देतानाच प्राणी कल्याणाच्या नियमांचे पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. आवश्यक परिस्थितीत दयामरणाची कार्यवाही ही केवळ लागू कायदे, नियम व अधिकृत पशुवैद्यकीय प्रक्रियेनुसारच करण्यात येईल, असे स्पष्ट करण्यात आले.

### कचरा व्यवस्थापन व जनजागृतीवरही भर

भटक्या कुत्र्यांच्या नियंत्रणासाठी केवळ निर्बीजीकरण करणे पुरेसे नसून निर्बीजीकरण, अँटी-रेबीज लसीकरण, तक्रार निवारण, आक्रमक कुत्र्यांवरील कायदेशीर व पशुवैद्यकीय कार्यवाही, कचरा व्यवस्थापन आणि नागरिकांमध्ये जनजागृती या सर्व उपाययोजनांचा समन्वयित पद्धतीने अवलंब करणे आवश्यक असल्याचे बैठकीत नमूद करण्यात आले.

कचरा उघड्यावर पडणार नाही, यासाठी संबंधित विभागांनी प्रभावी उपाययोजना कराव्यात तसेच नागरिकांनीही कचरा रस्त्यावर अथवा उघड्यावर टाकू नये, याबाबत जनजागृती करण्याचे निर्देश देण्यात आले. कचरा व्यवस्थापनात सुधारणा झाल्यास भटक्या कुत्र्यांना सहज उपलब्ध होणाऱ्या अन्नस्रोतांवर नियंत्रण आणण्यास मदत होणार असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

महानगरपालिका आरोग्य विभागामार्फत कुत्रा चावल्यानंतर नागरिकांना उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या अँटी-रेबीज लसीकरणाच्या सुविधेचा देखील आढावा घेण्यात आला. कुत्रा चावल्यानंतर नागरिकांनी विलंब न करता वैद्यकीय उपचार घ्यावेत, याबाबत जनजागृती करण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात आली.

महापौर विनायक दादा कोंड्याल यांनी संबंधित विभागांना समन्वयाने काम करून भटक्या कुत्र्यांच्या समस्येवर तातडीने आणि दीर्घकालीन स्वरूपात उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या.

'सोलापूर शहरातील नागरिकांची सुरक्षितता ही सर्वोच्च प्राथमिकता आहे. भटक्या कुत्र्यांच्या नियंत्रणासाठी निबीर्जीकरण, अँटी-रेबीज लसीकरण, तक्रार निवारणासाठी आवश्यक यंत्रणा, कचरा व्यवस्थापन आणि जनजागृती या सर्व बाबींवर एकत्रितपणे काम करण्यात येईल. वैज्ञानिक, कायदेशीर, मानवीय आणि दीर्घकालीन उपाययोजनांच्या माध्यमातून ही समस्या प्रभावीपणे हाताळण्यासाठी महानगरपालिका प्रशासन कटिबद्ध आहे,' असे महापौर विनायक दादा कोंड्याल यांनी सांगितले.

बैठकीस महापालिकेच्या पशुवैद्यकीय विभाग, आरोग्य विभागातील संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### नागरिकांच्या तक्रारींवर तातडीने कार्यवाही

भटक्या कुत्र्यांबाबत नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारींवर जलदगतीने कार्यवाही होण्यासाठी उपलब्ध असलेल्या डॉग कॅचिंग वाहनांची संख्या वाढविण्याबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली. पशुवैद्यकीय विभागामार्फत आणखी ४ डॉग कॅचिंग वाहने उपलब्ध करण्याची आवश्यकता मांडण्यात आली. यावर महापौर विनायक दादा कोंड्याल यांनी तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना देत २ डॉग कॅचिंग वाहने खरेदी करण्याची प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना दिले. अतिरिक्त वाहनांमुळे शहरातील विविध भागांमध्ये एकाच वेळी कार्यवाही करणे शक्य होऊन नागरिकांच्या तक्रारींचे निवारण अधिक जलदगतीने होण्यास मदत होणार आहे.

# शेतकऱ्यांचे सरसकट पंचनामे करून तातडीने मदत द्या

## भगीरथ भालके यांचे उदय सामंत यांना निवेदन

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** ऐन पावसाळ्याच्या दिवसांत पावसाने ओढ दिल्याने पंढरपूर तालुक्यासह परिसरातील शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे. अपेक्षित पाऊस न झाल्यामुळे दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. शासनाने तातडीने दखल घेऊन शेतकऱ्यांचे सरसकट पंचनामे करावेत आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना त्वरित आर्थिक मदत मिळावी अशी मागणी शिवसेनेचे नेते भगीरथ भालके यांनी आज राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांच्याकडे समक्ष भेटून निवेदनाद्वारे केली.



ऐन पावसाळ्याच्या दिवसांत पावसाने ओढ दिल्याने पंढरपूर तालुक्यासह परिसरातील शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे. अपेक्षित पाऊस न झाल्यामुळे दुष्काळसदृश परिस्थितीनिर्माण झाल्याने बळीराजा शेतकरी मोठया अडचणीत सापडला आहे. शेतीवर अवलंबून असलेल्या शेतकरी कुटुंबांसह पशुपालकांच्या अडचणीही वाढल्या असून जनावरांच्या चाऱ्याचा तसेच पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. पावसाळा सुरू झाल्यानंतर शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने खरीप पिकांची पेरणी केली. मात्र पेरणीनंतर अपेक्षित पाऊस झाला नसल्याने शेतकऱ्यांच्या डोळ्यांसमोर उभी पिके करपण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. पेरणी, बियाणे, खते, औषध फवारणी आणि मशागतीसाठी केलेला खर्च आधीच शेतकऱ्यांच्या माथी आला असून उत्पादन हातातून जाण्याची भीती निर्माण झाली आहे.

शासनाने दुष्काळी परिस्थितीचा गांभीर्याने विचार करून सरसकट पंचनाम्याची प्रक्रिया तातडीने सुरू करावी, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, तसेच जनावरांसाठी चारा आणि नागरिक व पशुधनासाठी पिण्याच्या पाण्याची आवश्यक व्यवस्था करावी, तसेच ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांचा शेतीसोबत पशुपालन हा महत्त्वाचा आधार असल्याने चारा टंचाईला सामोरे जावे लागत आहे असल्याने जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्नही गंभीर होत चालला आहे. हिरवा चारा उपलब्ध होण्याचे प्रमाण कमी झाल्याने पशुपालकांसमोर जनावरांच्या संगोपनाचे आव्हान निर्माण झालेले आहे. जनावरांसाठी चारा छावणी उभारणे देखील गरजेचे आहे असे ही भगीरथ भालके यांनी निवेदनात म्हटले आहे.

# नि:स्पृह पत्रकार व निगर्वी व्यक्तिमत्व रामभाऊ जोशी- डॉ. विश्वनाथ कराड

**पुणे, (कटूसत्य वृत्त):-** "पत्रकारितेतील प्रदीर्घ पर्व म्हणजे रामभाऊ जोशी . सात दशकांचा त्यांचा काळ आदर्श, अभ्यासू आणि निकोप होता. पत्रकारिता त्यांचा श्वास आणि ध्यास होता. त्यांची ओळख ही निःस्पृह पत्रकार व निगर्वी व्यक्तिमत्व अशी होती," असे विचार माईर्स एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांनी व्यक्त केले.

अनिल जोशी लिखित "रामभाऊ जोशी - जीवन प्रवास" या चरित्रग्रंथाचे प्रकाशन



डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या हस्ते एमआयटी डब्ल्यूपीयू च्या संत ज्ञानेश्वर सभागृहात करण्यात आले. या वेळी अध्यक्ष म्हणून ते बोलत होते. ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत डॉ. उल्हासदादा पवार आणि रामभाऊ जोशींचे बंधू व या चरित्रग्रंथाचे लेखक अनिल जोशी हे प्रमुख पाहुणे म्हणून यावेळी उपस्थित होते.

तसेच एमआयटीचे वरिष्ठ सल्लागार डॉ. एस. एन. पठाण, प्रा. मिलिंद पात्रे, विश्वास जोशी, संवित पेंडसे, पश्यंती जोशी, उज्वला भालेराव, राधा जोशी, चैतन्य जोशी, ऋता कांटे, आनंद जोशी, स्नेहा जोशी, अजित जोशी, स्वाती जोशी उपस्थित होते.

प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले,"रामभाऊ एक उत्तम पत्रकार, कुशल संघटक, लेखक, नाट्यसंगीत जाणकार, आस्वादक आणि कार्यकर्ते होते. सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात क्रियाशील होते. सेनापती बापट मार्गालगत पत्रकारनगर स्थापनेमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग होता. हसतमुख, हजरजबाबी, निर्गवी रामभाऊ हे होतकरू पत्रकारांचे मार्गदर्शक होते."

डॉ. उल्हासदादा पवार म्हणाले, " सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय क्षेत्रात रामभाऊंनी पत्रकारितेच्या सात दशकांत अनेक स्थित्यंतरे पाहिली. निःस्पृह व परखडपणे ते भाष्य करत राहिले. अशा पत्रकारितेची आज आवश्यकता आहे."

अनिल जोशी म्हणाले," बुद्धिमान, प्रेमळ, जाणकार, निरपेक्ष, व्यासंगी असे अनेक गुणवैशिष्ट्य असलेले व्यक्तिमत्व मला भाऊ म्हणून लाभणे व त्यांच्या चरित्र लिखाणाची संधी मिळणे, हे माझे भाग्य आहे. त्यांचे चरित्र अनेक पिढ्यांना मार्गदर्शक ठरेल."

सूत्रसंचालन भागवत बिऱ्हाडी व आभार डॉ. महेश थोरवे यांनी मानले.

# चंद्रभागा वाळवंट स्वच्छता अभियान उत्साहात संपन्न

**पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर शहरातील चंद्रभागा वाळवंट परिसर स्वच्छ, सुंदर व निर्मळ ठेवण्याच्या उद्देशाने पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर यांच्या पुढाकाराने आज चंद्रभागा वाळवंट परिसरात विशेष स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानास विविध सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक संस्थांनी उत्स्फूर्तपणे संख्येने सहभाग नोंदविला. या स्वच्छता अभियानातून तब्बल 18 टन कचरा संकलित करण्यात आला असल्याची माहिती मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली.

सदर स्वच्छता अभियान पंढरपूर नगरपरिषद, जोगदंड महाराज वारकरी शिक्षण संस्था, श्री विठ्ठल गुरुकुल शिक्षण संस्था, पंढरपूर इस्कॉन तसेच विठ्ठल रुक्मिणी सुखाचे जीवन, रेंदाळ (ता. हातकणंगले) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले होते.या अभियानात संबंधित संस्थांचे पदाधिकारी व स्वयंसेवक, पंढरपूर नगरपरिषदेचे विविध विभागाचे अधिकारी कर्मचारी तसेच पदाधिकारी व नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला होता.

चंद्रभागा वाळवंट परिसरात राबविण्यात आलेल्या या विशेष स्वच्छता अभियानामध्ये मोठ्या प्रमाणावर कचरा संकलित करण्यात आला. अभियानादरम्यान 18 टन कचरा संकलित करून त्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी व्यवस्था करण्यात आली.



स्वयंसेवक, कर्मचारी, विद्यार्थी व नागरिकांनी श्रमदानातून परिसरातील कचरा, प्लास्टिक व इतर घनकचरा संकलित करून परिसर स्वच्छ करण्यात आला.यावेळी अभियानाच्या माध्यमातून सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, प्लास्टिकमुक्त परिसर आणि पर्यावरण संवर्धनाबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली.

### 'स्वच्छता हीच विठ्ठल सेवा'चा संदेश

पंढरपूर हे महाराष्ट्रातील प्रमुख तीर्थक्षेत्र असून श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी राज्याच्या विविध भागांतून मोठ्या संख्येने भाविक पंढरपुरात येत असतात. चंद्रभागा नदी व वाळवंट परिसराला धार्मिक तसेच सांस्कृतिक महत्त्व असल्याने हा परिसर स्वच्छ व निर्मळ ठेवणे ही प्रत्येक नागरिकाची आणि भाविकांची सामूहिक जबाबदारी आहे.यावेळी 'स्वच्छता हीच विठ्ठल सेवा', 'श्रमदानातून भक्ती' आणि 'सहभागातून स्वच्छता' या संदेशांच्या माध्यमातून नागरिकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्यात आले.

### दर बुधवारी श्रमदान अभियान

पंढरपूर शहर अधिक स्वच्छ, सुंदर आणि निर्मळ करण्याच्या उद्देशाने पंढरपूर नगरपरिषदेमार्फत दर बुधवारी सकाळी ७.३० वाजता स्वच्छता व श्रमदान अभियान आयोजित करण्यात येणार आहे. या अभियानात शहरातील नागरिक, सामाजिक संस्था, स्वयंसेवी संस्था, शैक्षणिक संस्था, विविध मंडळे आणि इतर इच्छुक संघटनांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, यासाठी नगरपरिषदेच्या आरोग्य विभागाशी संपर्क साधून आपल्या संस्थेची नोंदणी करावी. नोंदणीसाठी उपमुख्याधिकारी रवींद्र सूर्यवंशी (भ्रमणध्वनी क्रमांक ८६६८८१४३६५) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन नगरपरिषदेच्या वतीने करण्यात आले आहे.

पंढरपूर शहर स्वच्छ, सुंदर, निरोगी व निर्मळ ठेवण्यासाठी सर्व नागरिकांनी स्वच्छता अभियानात सक्रिय सहभाग नोंदवून 'स्वच्छ पंढरपूर - सुंदर पंढरपूर' या संकल्पनेला बळ द्यावे, असे आवाहनही यावेळी मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी केले.

# अकलूज शहरातील नागरिकांनी पाणी जपून वापरावे- शिवतेजसिंह

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** नगरपरिषदेच्या अंतर्गत सुमारे 8 हजार 530 नळ कनेक्शन आहेत. अमृत 2.0 पाणी पुरवठा योजनेचे काम प्रगती पथावर आहे. विझोरी येथील पाणी पुरवठा तळ्याचेही काम सुरु आहे. परंतु अत्यल्प पडलेल्या पावसामुळे सगळीकडेच पाणी टंचाई निर्माण झाली आहे. अकलूज शहरातील नागरिकांनी पाणी जपून वापरावे, पाण्याची नासाडी करू नये. नळांना मोटारी लावू नये असे आवाहन उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते पाटील यांनी पत्रकार परिषदेमधून अकलूजच्या नागरिकांना केले.

सदध्या अकलूज शहराला 4 दिवसाआड पाणी पुरवठा सुरु आहे. पुढील पाणी पाळी कधी



मिळेल हे सांगता येणार नाही. त्यामुळे अकलूजकरांना तीव्र पाणी टंचाईचा सामना करावा लागण्याची चिन्हे आहेत. त्याच पार्श्वभूमीवर सूचना देण्यासाठी मोहिते पाटील यांनी पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. यावेळी नगराध्यक्षा रेश्मा आडगळे यांच्यासह सर्व नगरसेवक नगरसेविका उपस्थित होते.

शहरातील अनेक भागानमधील नळाच्या तोट्या लोकांनी काढून टाकल्या आहेत. त्यामुळे बेसुमार पाणी वाया जाते. अनेक लोक नळांना मोटारी लावतात. यासाठी सर्व नगरसेवक मिळून संवाद मेळावा घेऊन नागरिकांना पाणी वापरा विषयी सूचना देणार आहेत. पाणी टंचाई काळात प्रत्येक प्रभागातील नगरसेवक प्रभागामध्ये फिरून पाहणी करणार आहेत. जे नागरिक पाण्याची नासाडी करतील त्यांचे नळ कनेक्शन कट करण्यात येईल.

नवीन पाणी पुरवठा योजनेच्या 148 किमी अंतरापैकी 98 किमी अंतरातील पाईपलाईचे काम पूर्ण झाले आहे. 77 मैलापासून 10.5 किमी पाईपलाईचे काम राहिले आहे तेही लवकर सुरु होईल. अकलूज शहरातील नगर परिषदेच्या अखत्यारितील 48 पैकी 22 बोर व्यवस्थित चालू आहेत. गरज पडली तर नागरिकांच्या पूर्व परवानगीने अधिग्रहीत करून वेळप्रसंगी पाणी पुरवठा केला जाणार असल्याची माहिती शिवतेजसिंह मोहिते पाटील यांनी दिली.